# [illegible] भारत

अशोक देशपांडे

भाग ४



... स. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र. 96270

IRBK-0116240

भारत पाक युद्ध–कथा माला

भाग ४

# विजयंता भारत

( कुमार कथा )

अशोक देशपांडे

IRBK-0116240

संजय
प्रकाशन पुणे ४

१९७५

मजय प्रकाशन–चौसष्ट

प्रकाशिका
सौ ललिता शंकर भावे
९१७।२२ फर्ग्युसन कॉलेज रोड
पुणे ४

© अशोक देशपांडे
श्रीपाद–सदन
वीर सावरकर पथ
पंढरपूर

प्रकाशन दिनांक
१ ऑगस्ट १९७५
लो. टिळक पुण्यतिथी शके १८९७

मूल्य ३ रुपये ५० पैसे

मुखपृष्ठ— जोशी आर्टस्

मुद्रक :
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस
सदाशिव पेठ पुणे ३०

नों.क्रा. ७६२८०

रात्रंदिवस थंडीवाऱ्यात,

शत्रूच्या हल्ल्याची तमा न करता,

भारताला विजय मिळवून देणाऱ्या,


जवानांस........

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पहिली सलामी नॅटची | ५ |
| २. | अमर असे ही वशलना | ११ |
| ३ | नवा धनाजी जाधव | १७ |
| ४ | येता हृटर पळती सेबर | २५ |
| ५. | पुण्याला धावत येईन | ३० |
| ६ | मुक्तिवाहिनीमुळे मुक्तता | ३७ |
| ७ | विमानाची झाली चाळणी | ४५ |
| ८. | नवा विक्रम | ५२ |
| ९ | गळके विमान आणले | ५७ |
| १०. | कॅनबेराची करामत | ६३ |

# १. पहिली सलामी नॅटची !

...नालय शाळा,
१५२४० ... दि
वि. ...बा.वा...



कलकत्त्याजवळील एका लष्करी विमानतळावर अगदी सामसूम होती. फारशी गडबड नव्हती. दुपारचे रखरख ऊन्ह रणरणत होते. नोव्हेंबरची २२ तारीख. फक्त खास टेहळे वैमानिकांच्या खोलीत तिघे वैमानिक आरामात बसले होते.

" कंटाळा आला बुवा " फ्लाईट लेफ्टनंट आर. मॅसी म्हणाले.

" नाहीतर काय ?" फ्लाईंग ऑफिसर पुण्याचा डॉन लाझारस म्हणाला. " रोज आपलं इथं यायचं...निवांत बसायचं नि पुन्हा परतायचं...यात काही मजा येईना...आपल्याला बुवा आता शिकार हवीय."

" अरे बाबा, तुझी इच्छा पूर्ण होईल." फ्लाईट लेफ्टनंट एम्. ए. गणपती म्हणाले, " याह्याखान काही गप्प बसणार नाही... त्याला खुमखुमी येणारच...अमेरिकेच्या फुकटचा साहित्यावर हा उड्या मारणारच .."

अशा गप्पा चालू आहेत तोवर अडीच वाजले. तेवढ्यात चहा आला. चहा संपत आहे तोच सावधानचा इषारा आला !

फ्ला. ले. गणपतींची वाणी खरी ठरली. चार पाकी सेबरजेट कलकत्त्याजवळील बोथरा क्षेत्रातील रंगघाट भागात भारतीय हद्दीत घुसली होती. डाक्क्याच्या बाजूने ती आली असावीत. हेर-गिरीचा प्रकार असावा.

तिघे वैमानिक आपापल्या ‘ नॅट ’ कडे धावले. त्यांच्याप्रमाणे नॅटही सुसज्ज होती. पहिला हुकूम फ्ला. ले. आर. मॅसीना मिळाला. काही सेकंदांतच त्यांचे नॅट हवेत झेपावले. त्यापाठोपाठ फ्ला. ले. गणपती व फ्ला. ऑ. डॉन लाझारस आकाशात धावले.

बांगलामध्ये पाकी अत्याचारांना ऊत आला होता. रोज नव-नव्या बातम्या येत होत्या. लक्षावधी निर्वासित भारतात त्या-पूर्वीच आलेले होते. रोज अजूनही येत होते. खुनाला वाचा फुटते असे म्हणतात. खरे आहे. पाकी सैतानांनी किती क्रूर कृत्ये केली याच्या कथा देशी–परदेशी वार्ताहरांनी गोळा केलेल्या होत्या. चतुर टेलिव्हिजन डोळ्यांनी त्या टिपून घेतल्या होत्या. जगभर हे सारे दाखविले जात होते. भारताच्या धोरणाची स्तुती केली जात होती. रोज येणारे हजारो निर्वासित येण्याचे बंद व्हायला पाहिजे, चालू असलेले भयानक वंशछेदन थांबले पाहिजे. ही मान-वतेची हाक भारताने जगाला घातली होती. पाकिस्तानचे पितळ त्यामुळे उघडे पडले. त्याचा डाव जगाच्या लक्षात आला. मुक्ति-वाहिनीने सळो की पळो करून सोडले होते. तिचा विजय वाढीला लागला होता. सीमेवरच्या पाकी तोफा भारतीय हद्दीत आग ओकू लागल्या होत्या. सतत गोळीबार तर चालू होताच. युद्धाची ठिणगी केव्हा पडेल याचा काही नेम नव्हता. कोणत्याही क्षणाला

युद्ध पेटले तरी सारी तयारी भारताची पूर्ण झालेली होती. प्रत्येक लष्करी विमानतळ सुसज्ज होता.

तिन्ही नॅट विमाने पिसाटासारखी आकाशात धावू लागली. पाकी राक्षसांना हुडकू लागली. नॅट आली रे आली की एक पळपुटा पाकी वैमानिक पळून गेला.

" अरे यार, ये शैतान कहाँसे आये ? " पाकी फ्लाईट लेफ्टनंट परवेज कुरेशीने नॅट आलेली पाहताच घाबरून जाऊन आपल्या सहकाऱ्याला विचारले. " भागो ! भागो ! जल्दी भागो ऽ ! " पाकी फ्लाईंग ऑफिसर खलील अहमदने सल्ला दिला.

पण आता त्यांना पळून जाणे अशक्य होते. तिन्ही पाकी विमानांना तिन्ही नॅटनी व्यवस्थित घेरले होते. जीवघेणा पाठलाग चालू झाला होता.

फ्ला. ले. गणपतींच्या पाठोपाठ फ्ला. ऑफिसर डॉन लाझारस होते. पाठीमागून सेबरजेट येऊ नये याची खबरदारी ते घेत होते. शिवाय त्यांच्या पुढील सेबरजेटचा ते पाठलाग करीत होते. त्यांची उत्सुकता शिगेला पोचली होती. अंगात विलक्षण चैतन्य संचारले होते. कुठला एवढा जोर आला होता कुणास ठाऊक ! त्यांनी वेग वाढविला. आता सेबरजेट तावडीत येऊ लागले होते. फ्ला. ऑ. डॉन लाझारसनी नेम धरला...त्यांचे व सेबरजेटचे अंतर कमी कमी होऊ लागले ... सेबरजेट आता अखेरची धडपड करू लागले...फ्ला. ऑ. डॉन लाझारसनी गोळ्या झाडल्या... त्यांची कामगिरी यशस्वी झाली...विमान पेटले...सेबरजेटचे धूड खाली कोसळले ! विजयी नॅट हवेत झेपावले ! शत्रूचे पहिले विमान नॅटने पाडले ! फ्ला. ऑ. डॉन लाझारसनी हा मान मिळविला. १९६५ मध्येही पहिले सेबरजेट स्क्वॉ. ली. कीलरनी

पाडले होते. त्यांचेही विमान नॅटच होते. त्या पाठोपाठ फ्ला. ले. पठाणियांनी दुसरे सेबरजेट पाडले होते. तेव्हापासून 'नॅट' चा विलक्षण धसका पाकी वैमानिकांनी घेतला होता.

आता फ्ला. ले. एम्. ए. गणपती सेबरजेटच्या मागे होते. तो वैमानिक हुलकावण्या दाखवीत होता. आता आपण नॅटच्या तावडीतून सुटत नाही हे त्याने ओळखले होते. आपले मरण तो लांबवत होता एवढेच. वेडीवाकडी वळणे घेत होता. त्याचप्रमाणे त्याचा पाठलाग चालू होता. फ्ला. ले. गणपती हट्टाला पेटले. एका बाजूला फ्ला. ले. आर. मॅसी एका सेबरजेटच्या मागे होते. फ्ला. ऑ. डॉन लाझारस सगळयात वर पहारा करीत होते. त्यामुळे कोणत्याच सेबरजेटला आता पळून जाणे अशक्य होते. पाकी वैमानिक चांगलेच गोत्यात सापडले होते. आकाशात विलक्षण दृश्य दिसत होते. दोन प्रचंड महाकाय विमाने व तीन पिटुकली भारतीय विमाने ! त्यांच्यापुढे अगदी किस झाडकी पत्ती. पण ह्या पत्तीचा असा विलक्षण दरारा होता की काही विचारायची सोय नव्हती.

फ्ला. ले. गणपती व सेबरजेट याचे अंतर कमी कमी होत चालले. अखेर त्यांनी गोळ्या झाडल्या. पाहता पाहता ते दुसरे धूडहि पेटले. आचके देत देत खाली पडले. प्रचंड स्फोट झाला. त्या पहिल्या विमानातील वैमानिकाप्रमाणे याही वैमानिकाने जीव वाचवायसाठी उडी मारली. त्या दोघांनाही तावडतोब पकडण्यात आले !

आता अवकाशात एकच धूड उरले होते. फ्ला. ले. आर मॅसी त्याच्या पाठोमागे होते. ते आता त्याच्या मगरमिठीतून सुटत नव्हते. पहिल्या दोन विमानांची गत त्या वैमानिकाने पाहिली

होती. त्यामुळे तो विलक्षण गडबडला होता. वेडीवाकडी वळणे घेत होता. पण काही उपयोग नव्हता. आता काही क्षणातच त्याचे भवितव्य घडणार होते. फ्ला. ले. मॅसीनी त्याला गाठलेच. पाहता पाहता ते धूड पेटले. आगीचा प्रचंड लोळ खाली कोसळला. त्यातील वैमानिकाला उडी मारता आली नाही. तो जळून मेला.

आता तिन्ही नॅट हवेत विलक्षण वैभवात विहरत होती. शत्रूचा निकाल लागला. त्याने केलेले पहिलेच आक्रमण अपयशी ठरले होते. त्याचा काय डाव होता कुणास ठाऊक. पण तो साधला नाही. जमला नाही. फसला.

यावेळी पहिले सेवरजेट पाडण्याचा मान पुण्याच्या फ्ला ऑ. डॉन लाझारसनी मिळविला. त्यामुळे त्यांना 'वीरचक्र' देण्यात आले. गौरव करण्यात आला.

फ्ला. ऑ. डॉन लाझारसना लहानपणापासून वैमानिक होण्याची इच्छा होती. पण घरात विशेषतः आईचा विरोध होता. म्हणून घरी पत्ताही न लागता विमानदलात त्यांनी प्रवेश मिळविला. आपल्या कर्तृत्वावर त्यांनी चांगलेच प्रावीण्य मिळविले होते.

दि. २२ ला जेव्हा त्यांनी विमान पाडल्याची बातमी आकाशवाणीवर दिली गेली तेव्हा त्यांच्या आईला विलक्षण आनंद झाला. त्या म्हणाल्या, "डोनाल्ड विमानदलात गेला त्याबद्दल मला आता मुळीच पश्चात्ताप वाटत नाही. उलट त्याचा अत्यंत अभिमान वाटू लागला आहे. त्याने पुण्याचे नाव राखले."

फ्ला. ऑ. डॉन लाझारस यांचे वडील श्री. जॉन पंजाबहून पुण्याला आले. पाकिस्तान निर्माण झाल्यावर झालेल्या प्रचंड हत्याकांडाला पाहून त्यांनी पाकिस्तान सोडले. आता ते स्वतःला महाराष्ट्रीयनच समजतात. मुलाने केलेला महापराक्रम पाहून ते

म्हणाले, "माझ्या मुलाच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राला विशेष आनंद झाला आहे. पुण्याची पराक्रमाची परंपरा डॉनने पाळली. आपला देश सदैव ताठ मानेने जगात वावरत राहो, अशीच माझी इच्छा आहे. त्यासाठी माझा मुलगा मी देशाला दिला आहे!"

'वीरचक्राचा' मान मिळालेले फ्ला. ऑ. डॉन लाझारस व त्यांचे पराक्रमी नॅट विमान ही भारताची शान आहे. पुण्याचे वैभव आहे. महाराष्ट्राचा मानबिंदू आहे.

* * * *

## २. अमर असे ही वंशलता



"बोलो !"

"जवाब दो"

"मुझे कुछ मालुम नही" फ्ला. ले. प्रदीप आपटे अखेर म्हणाले.

"तुम्हारे क्या क्या ऑपरेशन्स है ?"

"मुझे कुछ पता नही."

"अगर तुम जवाब नही दोगे तो मैं गोली चलाऊंगा" पाकी अधिकारी संतापून गरजला, "याद रख्खो ! तुम कैदी हो ! तुम्हे जवाब देनाही पडेगा ... नही तो ... तुम्हे मजबूर किया जायगा."

"आय ॲम व्हेरी सॉरी" फ्ला. ले. प्रदीप आपटे शांतपणे म्हणाले, "आय डोन्ट नो ऐनिथिंग"

"इन्हे कोठडीमे बंद कर दो" तो पाकी अधिकारी लालबुंद होऊन म्हणाला, "जब तक ये बतायेगा नहीं, तब तक इन्हे खाना पिना कुछ नही मिलेगा"

मगरूर पाकी शिपायानी फ्ला. ले. प्रदीप आपट्यांना शेजारच्या खोलीत ढकलून कुलूप लावून टाकले. आत पिण्यासाठी पाणीही नव्हते.

राजस्थानातील बारमेरचा उत्तरलाई विमानतळ. ह्या सीमे-जवळील लष्करी विमानतळावर पाकी हवाईदलाचा फार डोळा. तीन डिसेंबरच्या पाकी हल्ल्यात शत्रूने ह्या विमानतळावर दात ओठ खाऊन १२९ बॉम्ब टाकले ! परंतु त्यापैकी एकही बॉम्ब उपयोगी पडला नाही. बहुतेक ते चिनी बनावटीचे असावेत ! विमानतळाचें कांहीही नुकसान झाले नाही. धावपट्टीवर तर एकही बॉम्ब पडला नाही. वा ऽ रे नेम !

४ डिसेंबरला याच उत्तरलाई विमानतळावरून कितीतरी विमाने पाकी प्रदेशावर हल्ला करण्यासाठी उडाली. त्यात विंग. क. बी. कृष्णमूर्ती, विंग. क. धवन, विंग. क. अग्रवाल, स्क्वा. ली. मागरी, स्क्वा. ली. बिंदरा, स्क्वा. ली. बक्षी, स्क्वा. ली. जठार, फ्ला. ले. कुकरेजा, फ्ला. ले. दत्ता, फ्ला. ले. समर शहा, फ्ला. ले. चौहान, फ्ला. ले. कसबेकर, फ्ला. ले. प्रदीप आपटे वगैरे होते. पाकिस्तानातील कितीतरी ठिकाणी यांनी प्रचंड बॉम्ब व रॉकेट्स टाकली. आगी लावल्या. पूल उडविले. धरणे फोडली. विमाने पाडली. विमानतळ नष्ट केले.

पुण्याच्या फ्ला. ले. आपट्यांना मात्र एक खास कामगिरी मिळाली होती. अचूक नेमबाजीत फ्ला. ले. प्रदीप आपटे विशेष प्रवीण होते. त्यामुळे त्यांच्यावर एक जबाबदारी येऊन पडली होती. कराचीला एक मालगाडी शस्त्रास्त्रे, रणगाडे, दारूगोळा वगैरे घेऊन वेगाने निघाली होती. आपल्या एका टेहळ्या विमानाने ही तातडीची खबर दिली होती. ही मालगाडी उद्ध्वस्त करण्याची कामगिरी फ्ला. ले. प्रदीप आपट्यांना करावयाची होती.

त्यांचे विमान उत्तरलाई विमानतळावरून झेपावले. काही क्षणातच ते पाकी हद्दीत शिरले. त्यांच्यासमोर नकाशा होताच. ते आपल्या ' टार्जेट ' वर आलेले होते. खालून नागमोडी वळणे घेत मोठ्या दिमाखात आगगाडी चालली होती. आपला मृत्यू आपल्या डोक्यावर तरगत आहे याची तिला कल्पना नव्हती. फ्ला. ले. प्रदीप आपटयांनी एकदम खाली झेप घेऊन बॉम्ब व रॉकेट्सचा अचूक मारा केला. वेडीवाकडी होऊन मालगाडी उलटी पालटी झाली. आगीचा डोंब उठला. डब्यातील दारूगोळ्यांचे स्फोट होऊ लागले.

फ्ला. ले. प्रदीप आपटयांचे कर्तव्य पूर्ण झाले होते. ते लगेच परत फिरले. त्यांच्याजवळ अजून काही बॉम्ब व रॉकेट्स शिल्लक होती. त्यामुळे अजून काही सावज मिळते का यासाठी ते बारकाईने पाहात होते.

पाकच्या वाळवंटी भागावरून आता त्यांचे विमान चालले होते. तोच त्यांना काही रणगाड्यांची हालचाल दिसली. त्यांनी आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधला. त्यांनी संमती देताच फ्ला. ले. प्रदीप आपटे खाली झेपावले. त्यांनी त्या रणगाड्यावर रॉकेट्सचा मारा केला. रणगाडे निकामी होऊन आकाशाकडे ' आ ' करून पडले !

फ्ला. ले. प्रदीप आपटे आता उत्तरलाई विमानतळाकडे निघाले. पण हे काय ? कॉकपिटमध्ये धूर ? रणगाड्यावर हल्ला करताना विमानवेधी तोफेचा गोळा लागला असावा. त्यांना त्यावेळी कळलेच नाही. धूर वाढू लागला. पाठीमागेही आग लागली असावी. पेटते विमान घेऊन भारतीय हवाई हद्दीपर्यंत येण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. पण जमले नाही. विमानाचा स्फोट होण्यापूर्वी क्षणभरच त्यांनी पॅरेशूटच्या साहाय्याने उडी मारली. तोच विमानाचा स्फोट झाला.

फ्ला. ले. प्रदीप आपटे शत्रूच्या मुलखात दुर्दैवाने पडले. आता सुटका अशक्य होती. नाइलाज झाला होता. दुसरा मार्गच नव्हता. जवळच पाकी ठाणे होते. तेथील सैनिकांनी त्यांना लगेच पकडून वरिष्ठांसमोर हजर केले !

शत्रूचे स्वागत भारतात होते. तो जर मृत्युपंथाला लागला तर त्याला आम्ही आमचे रक्त देऊन वाचवितो. तो जर जखमी असेल तर त्याला हॉस्पिटलमध्ये ठेवतो. सलाईन लावतो. ऑक्सिजन देतो. तो एकदाचा हसला की आम्ही सुखावून जातो. हजारो पाकी शत्रू आम्ही पाहुण्यासारखे सांभाळतो. त्यांची राजेशाही बडदास्त ठेवतो. आम्ही किती चांगले आहोत, आंतरराष्ट्रीय नियम आम्ही कसे पाळतो, 'जिनीव्हा' करारानुसार आम्ही कसे वागतो हे जगाला पटवून देण्यात आम्ही धन्यता मानतो.

याह्याखानाला व त्याच्या अधिकाऱ्यांना याची जरूर लागत नाही. मानवता हा शब्द त्यांच्या कोशात नाही. शांततेशी त्यांचे वाकडे आहे. माणसाचे हालहाल करून मारणे हे त्यांना काहीच नाही. औरंगजेबापासून ते पूर्वपरंपरेने चालत आले आहे. संभाजी-राजांना औरंगजेबाने कसे मारले हे जग अजून विसरले नाही.

फ्ला. ले. प्रदीप आपट्यांना पाहताच याह्यासुराच्या त्या अधि-काऱ्याच्या डोळ्यांत मूर्तिमंत सूड पेटला. अंगार ! द्वेष ! मत्सर ! चंगीझखानापासून चालत आलेले हे त्यांचे गुणधर्म आहेत. जीवदान दिलेला महंमद घोरी देखील, पृथ्वीराज चव्हाणाविरुद्ध उलटला होता. त्या पाकी अधिकाऱ्याचे डोळे चमकले ! भार-ताचा एक झुंजार वैमानिक त्यांच्या तावडीत सापडला होता. आता त्याच्यापासून भारताचे पुढील मनसुबे मिळतील, हवाई

हल्ल्याच्या योजना मिळतील. त्याने त्या सांगितल्या तर ठीक. नाहीतर कुत्र्यासारखे हालहाल करून त्याला ठार मारू !

फ्ला. ले. प्रदीप आपटे त्यांचे बारसे जेवले होते. त्यांच्याजवळील डायरी व कागदपत्रे उडी मारताना त्यांनी विमानात टाकली होती ! विमानाबरोबर ती जळून गेली असतील ! त्यांची जेव्हा झडती घेतली त्यावेळी शत्रूला काहीही सापडले नाही ! त्यामुळे तो पाकी अधिकारी अधिक चिडला. फ्ला. ले. आपट्यांचे हालहाल करू लागला. त्याला अपेक्षित उत्तरे मिळेनात. काही केल्या ते काहीही सांगेनात.

फ्ला. ले. प्रदीप आपट्यांच्या चेहऱ्यावर कसलाही विकार नव्हता. भीती तर त्यांना माहीतच नव्हती. ते संभाजीच्या मुलखातील होते. मऱ्हाठे होते. मऱ्हाठा कधी इमान विकीत नसतो. तो मिठाला जागतो. देशाला जागतो. मग प्राण गेला तरी हरकत नाही.

फ्ला. ले. आपट्यांना आपले भवितव्य कळून चुकले. त्या पाकी सैतानाच्या रूपाने साक्षात मृत्यू समोर उभा होता. त्यांचा तो निर्धार पाहून कदाचित तोच ओशाळला असेल. शांत चित्ताने ते उभे होते. त्यामुळे तो पाकी सैतान अधिकच खवळत होता. देशासाठी बलिदान करणारे कितीतरी हुतात्मे त्यांच्या डोळ्यांसमोर क्षणभर उभे राहिले.

"ऐ काफीर" तो अधिकारी गरजला, "तुम्हारे टार्गेट बतावोऽ नही तो......!"

"क्या करोगे ?" फ्ला. ले. प्रदीप आपट्यांनी प्रथमच न राहवून विचारले.

"गोली मारूंगा" सैतान छद्मी हसला.

"बस्स...! आप खुषीसे मार सकते है। ये मेरा तो सपना है। जान जायेगी तो देशके। लिये आवो! उठाओ अपना पिस्तौल..."

"ये हिंमत!"


गोळ्या सुटल्या. सैतानाने भराभर त्यांच्या छातीवर गोळ्या मारल्या. निष्प्राण देह खाली कोसळला. देशप्रेमाने रसरसलेले एक तेज मावळले.

फ्ला. ले. प्रदीप आपटे देशासाठी अमर झाले. संभाजी महाराजांची थोर परंपरा त्यांनी राखली. पुण्याचे नाव उजळले. हसत हसत त्यांनी मरणाला मिठी मारली. ते चिरंजीव झाले.

'मरणोत्तर' त्यांना 'वीरचक्र' मिळाले! हा गौरव त्यांच्या दुर्दम्य निष्ठेचा आहे. अजोड देशप्रेमाचा आहे. महाराष्ट्राच्या पौरुषाचा आहे. देशाच्या उज्ज्वल भवितव्याचा आहे.

* * *

# ३. नवा धनाजी जाधव



अरे ! हे काय ? ही अगडबंब सेबरजेट्स पळून का गेली ? आतां ह्या भारतीय विमानांना कोण आवरणार ? अडविणार ? चिलटासारखी दिसणारी ही नॅट विमाने काय करणार आहेत ! आता ह्या छांब भागाचे कसे व्हायचे ? याह्याखानाला काय वाटेल ? भुट्टोला झोप कशी येईल ? अरे ! जग काय म्हणेल ? काय म्हणता कीलर बंधूंना अजून घाबरत आहेत पाकी वैमानिक ! कमाल आहे ! १९६५ चे युद्ध होऊन किती तरी वर्षे झाली ! पण कीलर बंधूंचा धसका अजून घेतलाय् ? त्यांना पाकी वैमानिक ‘ सेबर-कीलर ’ म्हणतात ! खरं आहे ! स्क्वा. लीडर डेन्झील कीलर व स्क्वा. लीडर ट्रेव्हर कीलर यांनी १९६५ मध्ये अमेरिकेची उद्दाम सेबरजेट्स मातीमोल करून टाकली, जमीनदोस्त केली !

१९६५ ते १९७१... सहा वर्षे झाली. ६५ चा तडाखा खाल्ला तरी पाकी सेनाधिकाऱ्यांची रग अजून जिरलेली नव्हती. अयूबखान

काय किंवा याह्याखान काय, सारे चंगीझखानाचेच अवतार. याह्याखानाला स्वतःच्या सामर्थ्याची विलक्षण घमेंड चढली होती. भारतावर हल्ला करणे म्हणजे अगदी क्षुल्लक गोष्ट आहे अशा थाटात तो पाकी रेडिओवर भुंकत होता.

माणसाची काही स्वप्ने कधीच पूर्ण होत नाहीत. माणूस जसजसा एखाद्या गोष्टीचा अधिक ध्यास घेतो तसतशी ती गोष्ट अधिकच दूर जाते. काश्मीरच्या बाबतीत पाकिस्तानी सेनाधिकाऱ्यांचे अगदी असेच झाले. काश्मीरशिवाय दुसरे तिसरे त्यांना काहीच दिसत नव्हते. पृथ्वीवरील हा निसर्गरम्य तुकडा त्यांना मोहवीत होता, खुणावीत होता. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर पाकड्यांनी पहिल्या प्रथम काय केले असेल तर काश्मीर बळकाविण्याचा फुसका प्रयत्न केला. तो जमला नाही तरी पण एक तुकडा गिळला. तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. यूनोच्या वेशीवर काश्मीरचा प्रश्न भिजत पडला.

१९६५ साली ‘ छांब ’ भागातून पाकड्यांनी पुन्हा एकदा काश्मीर घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. आणि आताही याह्याखानाला खुळी आशा होती. आपली प्रचंड सेना व चिलखती दल त्याने छांब परिसरात गोळा केले. तो छांब भागात भारतीय सेनेवर तुटून पडणार होता... काश्मीर बळकावणार होता.

१९६५ च्या वेळी ‘ सेबरजेटची ’ ची घमेंड पहिल्या धडाक्याला ‘ कीलर ’ बंधूंनी उतरविली होती. अमेरिकेची ही शान काळीठिक्कर पडली होती. ह्या ‘ कीलर ’ बंधूंचा पाकी वैमानिकांनी त्यावेळी इतका धसका घेतला होता की नॅट विमान दिसले रे दिसले की अगडबंब पाकी सेबरजेट पळत सुटत. धनाजी जाधव व संताजी घोरपडे अजून मोगल विसरले नसतील. औरंगजेबाच्या पळपुट्या सेनेला त्यांची विलक्षण दहशत होती. कीलर बंधू हे त्यांचे नवे अवतार ठरले ! आले कीलर पळाले सेबर !

छांब भागातील शत्रूची मुसंडी रोखणे भाग होते. याह्यासुराने ह्या भागात आपले प्राण पणाला लावले होते. भारतीय सेनेला जबरदस्त मोल द्यावे लागत होते. जवानांच्या मदतीला हवाईदल धावून आले.

स्क्वाड्रन लीडर डेन्झील कीलर हुकमाची वाट पाहात होते. त्यांचे विमान तयार होते. कधी एकदा पुन्हा हवेत झेप घेतोय असे त्यांना झाले होते. गेले तीन दिवस त्यांनी शत्रूवर कितीतरी वेळा हल्ले केले होते. विशेषत: चिनी वनावटीचे Tye हे रणगाडे व सेबरजेट्स नष्ट केली होती. शत्रूजवळ हे साहित्य विपुल होते. त्यामुळे कितीही खलास झाले तरी पुन्हा नवे तयार असायचे. असे तडाखेबंद हल्ले अलीकडे तरी जगात कुठे झाले नसतील ! वैमानिकांना अजीबात उसंत नव्हती. हल्ला करून विमानतळावर उतरायचे... 'माल' भरून होईपर्यंत थांबायचे. भरून झाला की दक्‍न घेऊन आकाशात विलक्षण भरारी मारायची. शत्रूवर तुटून ायचे. आग ओकणाऱ्या विमानवेधी तोफांचा भडिमार चुकवून आपली कामगिरी पूर्ण करायची. भारतीय विमानांचे तांडेच्या तांडे ह्या जगावेगळ्या करामती करीत होते.

स्क्वा. ली. डेन्झील कीलरांना आता महत्त्वाची कामगिरी पार पाडायची होती. मुनव्वर तावी नदीजवळ तुफानी संग्राम चालू होता. भारतीय जवान पंचप्राणांची कुरवंडी करून लढत होते. शत्रूची जबरदस्त तयारी होती. पाकी जनरल टिक्काखान रोज नव्या योजना आखीत होता. झुंजार भारतीय वैमानिक त्यांची राखरांगोळी करीत.

शत्रूला रसद पुरविणाऱ्या एका नव्या ठाण्यावर आता अचानक हल्ला करायचा होता. ह्या ठाण्याचा शोध चलाख भारतीय

वैमानिकांनीच लावला होता. अगदी खाली येऊन फोटो घेतला होता. ते ठाणे तातडीने नष्ट करायला हवे होते. स्क्वा. ली. डेन्झील.कीलर आपला तांडा घेऊन निघाले. त्या ठाण्यावर अक्षरशः तुटून केव्हा पडू असे प्रत्येकाला झाले.

ते ठिकाण येताच भारतीय वैमानिक आपली करामत दाखवू लागले. शत्रू सावध होताच. विमानवेधी तोफा आग ओकू लागल्या. सेबरजेट्सही धावून आली ! पण काय कारण झाले कुणास ठाऊक, लगेच पळाली ! त्यांना स्क्वा. ली. कीलर आल्याचा सुगावा लागला की काय ?

स्क्वा. ली. कीलर अगदी खाली येऊन हल्ले करीत होते. शत्रूची एक तोफ त्यांच्या विमानाचा वेध घेत होती. पण स्क्वा. ली. कीलर विमानाला अशी काही गती देत होते की विमानवेधी तोफा चालविणाऱ्या पाकी गनर्सना त्यांचा अचूक वेध घेता येत नव्हता. त्यामुळे स्क्वा. ली. कीलरांचे कार्य व्यवस्थित चालू होते. काही क्षणापूर्वी शांत असणारा तो भाग भाजून पोळून निघाला होता. कानठळ्या बसतील असे प्रचंड आवाज सर्वत्र घुमू लागले होते.

सगळीकडे आग व धूर. प्रचंड धूर. काही दिसत नव्हते. दिसेना. स्क्वा. ली. कीलर इतक्या खाली आले की त्यांच्या विमानाला चुकून अचूक तोफगोळा लागला. पाकी गनर्सनी हवेत उडविलेला गोळा अगदी चुकून लागला ! त्यांचे काम झाले. विमान पेटले !

स्क्वा. ली. कीलरला कळून चुकले. आता विमान वाचणार नव्हते. आग वाढणार होती. विमानाचा स्फोट होणार होता. त्यांना त्यांच्या प्राणाची काळजी नव्हती. चिंता एकच होती की विमान शत्रूच्या भागात होते. ते तेथे पडायला नको होते. शत्रूची उद्दाम माती हसली असती.

आता जळके विमान घेऊन स्क्वा. ली. कीलर झपाट्याने निघाले. त्यांना दिसत होती फक्त मायभूमी. भारतमाता. त्यांना खुणावीत होता तो छांबचा मनोहारी प्रदेश. पेटलेले विमान घेऊन परतणारा भारतीय वैमानिक पाहून पाकी सेना तोंडात बोट घालत होती ! तोबा ! तोबा ! केवढे हे धाडस. त्याच ठिकाणी पाकी वैमानिक असता तर त्याने विमान केव्हाच सोडून दिले असते. आपले बहुमोल प्राण वाचविण्यासाठी कधीच उडी मारली असती. पण स्क्वा. ली. कीलर भारतीय वैमानिक होते. त्यांना ही शिकवण नव्हती. भीती त्यांना माहीत नव्हती. पळ काढणे हा त्यांचा धर्म नव्हता. कार्य पुरे झाल्याशिवाय परतण्याची त्यांची परंपरा नव्हती.

आता शेवटचा क्षण आला. स्फोट होऽणाऽर विमानाचे तुकडे तुकडे होणाऽर... आता काय ? आता इलाज नव्हता. स्क्वा. लीडर कीलरांनी पॅरेशूटच्या आधाराने उडी मारली. काही सेकंदांतच विमानाच्या ठिकऱ्या झाल्या.

स्क्वा. ली. कीलरांनी भारतीय हवाई केन्द्राला शेवटचा संदेश दिला... 'विमानाचा स्फोट होत आहे... मी उडी...!' खलास. आवाज बंद पडला ! संदेश अपूर्ण राहिला. विमानाचे बिनतारी केन्द्र बंद पडले, विमान नष्ट झाले. केन्द्राच्या केबीनमध्ये गोंधळ उठला ! स्क्वा. ली. कीलरांचे काय झाले ? त्याच्या तांड्यातील वैमानिक व इतर वरिष्ठ अधिकारी बुचकळ्यात पडले !

असे कसे झाले ? स्क्वा. लीडर कीलरांचे असे कसे झाले ? त्यांचे प्राण वाचले का ? ते जिवंत आहेत का ? प्रत्येकाला आठवू लागले त्यांचे सारे पराक्रम. ती जिद्द. ती उमेद. ती महत्त्वाकांक्षा. तो त्यांचा हसरा चेहरा. ती करारी मुद्रा. कुणाला खरे वाटेना.

विश्वास बसेना. ११६५ मध्ये ह्याच कीलरांनी अयूब–भुट्टोची झोप उडविली होती. अमेरिकेची शान नष्ट केली होती. पाकी वैमानिकांना जिकडे तिकडे कीलर बंधू दिसू लागले होते. असे कीलर कधी शत्रूच्या तावडीत सापडतील का ? छे ? त्यांचे प्राण? मुळीच जाणार नाहीत ! का ? त्यांचे कार्य अजून पूर्ण व्हायचे आहे. किती तरी सेबरजेट्स त्यांची वाट पाहात आहेत !

स्क्वा. लीडर कीलरनी उडी मारली खरी. पण प्रचंड वाऱ्यामुळे अशी काही करामत झाली! की त्यांना नीट उतरता आले नाही. त्यांच्या छत्रीने त्यांना दगा दिला. ते पाठीवर दाणकन् पडले ! पुढे काय झाले हे त्यांना कळले नाही. त्यांच्या पाठीचे काय झाले असेल कुणास ठाऊक !

ते ज्या ठिकाणी पडले त्याच्या एका बाजूला पाकी सेना खडी होती तर दुसऱ्या बाजूला भारतीय जवान उभे होते. ते विलक्षण वेगाने खाली पाठीवर जे पडले ते पुन्हा हललेच नाहीत ! काहीच हालचाल नाही !

शत्रूच्या सैनिकांना ते मेलेलेच आहेत असे वाटले ! इतक्या उंचावरून पडून कोण वाचणार. शत्रू पाहात राहिला. जवळ जाऊन पाहण्याची कुणाचीहि इच्छा नव्हती. त्यांच्या प्राणाचे त्यांना मोल वाटत नव्हते. याह्यासुराने त्यांना माणुसकी शिकविली नव्हती.

भारतीय मेडिकल कोअरच्या जवानांनी स्क्वा. लीडर कीलरांना हेरले. ते जिवंत असतील ! त्यांना उचलून आणणे त्यांचे कर्तव्य होते. त्यांचे प्राण वाचविण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न करणे भाग होते.

तुंबळ लढाई चालू होती. गोळ्यांचा वर्षाव चालू होता. कशाचीच काही खात्री नव्हती. ‘ कॉट ’ असलेली खास जीप घेऊन भारतीय मेडिकल कोअरचे स्वयंसेवक जवान निघाले. ‘ तांबडी

फुली ' असलेली जीप हे देवदूत घेऊन निघाली. स्क्वा. लीडर कीलर पाठीवर पडले होते. त्यांना बसता येणार नाही हे हेरून कॉटवर त्यांना झोपवून आणण्यासाठी खास जीप निघाली. ' रेडक्रॉस ' असलेल्या वाहनावर हल्ला करायचा नाही हा आंतरराष्ट्रीय नियम याह्यासुराच्या असुरांना माहीत नव्हता. मानवतेचे सारे नियम त्यांनी धाब्यावर बसवले होते.

गोळ्यांचा मारा चुकवीत ड्रायव्हरने गाडी त्या ठिकाणी अचूक नेताच स्वयंसेवक जवानांनी स्क्वा. लीडर कीलरांना तातडीने उचलले. त्यांची नाडी चालू होती. पाठ रक्तबंबाळ झाली होती. ते बेशुद्ध होते !

जीपने बिनतारी संदेश दिला ! स्क्वा. लीडर डेन्झील कीलर जिवंत आहेत ! कीलर जिवंत आहेत ! ती येशूची कृपा होती. विमानतळावर आनंदाचे वातावरण पसरले. त्यांचा मित्रपरिवार आनंदाने नाचू लागला. त्यांच्या बंधूंना ... स्क्वा. लीडर ट्रेव्हर कीलरना ... शब्द फुटत नव्हता. त्यांच्या भावाचे विमान पडलेले कळताच ते विलक्षण काळजीत पडले होते. आपला भाऊ परत येणार असे त्यांना वाटत होते. गळ्यातील क्रॉस त्यांना हेच सांगत होता ! खात्री वाटत होती. आता त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू येत होते.

स्क्वा. लीडर डेन्झील कीलरांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. त्यांचा कणा मोडला होता. त्यांना विशिष्ट तऱ्हेच्या प्लॅस्टर-मध्ये ठेवण्यात आले. हवाईदलाचे प्रमुख अेअर चीफ मार्शल प्रकाशचन्द्र लाल त्यांना पाहण्यासाठी खास आले होते


भारताच्या ह्या महान पराक्रमी वायुपुत्राला काही काळ प्लॅस्टरमध्ये जरी राहावे लागले तरी एक दिवस असा उगवेल की

त्यांचे विमान पुन्हा आकाशात झेपावेल ! ती गरुड झेप पाहून भारताचे निळेशार आकाश पुन्हा सुखावेल. आता त्याची चिंता थोडी दूर होईल. त्याची काळजी घेणारा वायुपुत्र पुन्हा तयार झाला होता. ...

धनाजी जाधव व संताजी घोरपडे चिरंजीव आहेत ! जोपर्यंत ह्या देशाला हिरव्या आक्रमणाची भीती आहे तोपर्यंत धनाजी जाधव व संताजी घोरपडे सतत निर्माण होत राहणार ... !

* * * *

## ९. येता हंटर पळती सेबर!



विविध राष्ट्रांनी दिलेल्या उधारउसनवार विमानांच्या जोरावर याह्याखानाचे हवाईदल तयार झालेले आहे. त्याची विमाने जगातील अगदी नामांकित असतील, गाजलेली असतील, अत्याधुनिक असतील, पण त्यांचे चालक? ते पाकिस्तानीच आहेत! त्यांना फक्त आठ दिवसांचे 'ट्रेनिंग' पुरेसे होते! आठ दिवसांत 'पायलट' झालेला एक पाकी वैमानिक १९६५ च्या युद्धात पकडला गेला होता! त्यांना कदाचित विमाने हवेत उडविता येत असतील पण विमानांच्या जीवघेण्या लढ्यात ते हार खातात! कुठलेही भारतीय विमान दिसले रे दिसले की ते विमान उलटे फिरवून पळतात. त्या बिचाऱ्या अगडबंब सेबरजेटला तर पटकन वळताही येत नाही!

भारतावर अचानक हल्ला जेव्हा याह्याने केला तेव्हा त्याची बी-५७ जातीची बॉम्बर्स 'मॉरीपूर' विमानतळावरून सुटत

होती. कराचीच्या पश्चिमेस हा लष्करी विमानतळ आहे. याहृयाच्या भाषेत हा अतिशय प्रभावी व दणकट विमानतळ आहे. पाकी हवाईदलाचा तो बालेकिल्ला समजला जातो.

पाकी विमानांची उड्डाणे खलास करण्यासाठी हा विमानतळ नष्ट करायला हवा होता. ती कामगिरी विं. क. डोनाल्ड कॉंक्वेस्ट, स्क्वा. ली. मेहता, स्क्वा. ली. नागी व फ्ला. ले. मुकर्जी ह्या ‘ हंटर ’ वैमानिकांनी उचलली.

चारी हंटर्स मॉरीपूरच्या रोखाने पिसाटासारखी सुटली. फ्ला. ले. मुकर्जींचे हंटर वाटेत बिघडल्यामुळे ते परत आले. तिन्ही हंटर्स पुढे धावली. खाली अफाट समुद्र पसरला होता. त्याच्या लाटांचा खेळ वरुन अगदी मनोहारी दिसत होता. स्क्वा. ली. मेहता हे दृश्य पाहून खूष होत होते. त्यांना समुद्रावरून उड्डाण करायला फार आवडते.

विं. क. कॉंक्वेस्टना काय लहर आली कुणास ठाऊक ! त्यांनी विमाने कराची शहरावरून नेण्याचे ठरविले ! तिन्ही हंटर्स कराचीच्या रोखाने येताच कराचीला हवाई हल्ल्याचे इषारे देण्यात आले. विमानवेधी तोफा आग ओकू लागल्या. तिन्ही हंटर्सनी कराचीला एकही बॉम्ब न टाकता असे काही धावरून सोडले की पाकी नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले ! विमानवेधी तोफांचा एकही गोळा विमानाला लागेना ! तेव्हा कराची बंदराच्या परिसरातील गनबोटींनी तोफा डागण्यास आरंभ केला ! कराचीचा ह्या हंटर्सचा काहीं संबंध नव्हता.

हंटर्स मॉरीपूरच्या रोखाने निघून गेली. जाता जाता तेवढीच गंमत ! मॉरीपूरच्या विमानतळावर काही बी–५७ विमाने सुटण्याच्या बेतात होती. तीन मिग–१९ उभी होती. काही क्षणांतच

तिन्ही हंटर्स त्या विमानावर व विमानतळावर तुटून पडली. पाकी विमाने जागच्या जागी आचके देत खलास झाली. विमानतळाची धावपट्टीही खराब झाली. कंट्रोल केबीनला आग लागली. सारा विमानतळ पेटून निघाला. कुठून तरी दोन चुकलेली सेबरजेट मॅारीपूरच्या रोखाने येत होती. एखाद्या भारतीय विमानाला चुकवून ती इथे पळत आली. आगीतून फुफाट्यात पडली! लांबून ती दिसताच स्क्वा. ली. मेहता व नागी 'वरुद्ध दिशेला धावले. त्या मूर्ख सेबरजेटांची अशी काही कोंडी केली की त्यांना आता पळणे शक्य नव्हते. हटर वैमानिकांनी चांगलाच कावा केला! बिचारी फसली. तावडीत सापडली. पाहता पाहता स्क्वा. ली. मेहता व स्क्वा. ली. नागींनी त्यांचा जीवघेणा पाठलाग चालू केला. वि. क. कॉंक्वेस्ट त्यांचा मार्ग रोखून धरीत होते. काही क्षणांतच दोन्ही अगडबंब सेबरजेट राक्षस आगीने लडवडून खाली कोसळले! पाहता पाहता शत्रूची सात विमाने नष्ट झाली.

हवेत डौलाने संचार करीत तिन्ही हंटर्स आपल्या विमानतळावर उतरली.

थोड्याच वेळात वि. क. कॉंक्वेस्ट अजून तीन हंटर्ससह पुन्हा कराचीच्या रोखाने निघाले. आता मात्र त्यांना कराची बंदरातील तेल टाक्या उद्ध्वस्त करायच्या होत्या. चारी हंटर्स कराचीवर येताच विमानवेधी तोफांचे जाळे फुकटचे गोळे हवेत उडवू लागले. बंदरावरील व बोटीवरील तोफाही चालू झाल्या. शहरात पुन्हा भोंगे झाले. लोकांची घाबरगुंडी उडाली. पळापळी चालू झाली. लोकांना कळेना की हे असे सारखे किती वेळा व्हायचे!

चारी हंटर्सनी तेलटाक्यावर रॉकेट्सचा प्रचंड मारा करताच पेट्रोल इमानाला जागले! पेटले! भयानक भडका उडाला. जीव-

घेणी आग बंदरात पसरली. भारतीय नाविकदलानेही याच वेळी कराची बंदरात बेधडक मुसंडी मारून कराची बंदर होते की नव्हते असे करून टाकले. शिवाजीमहाराजांनी एकदा बादशहाची ‘ सुरत ’ बेसुरत करून टाकली होती. तोच प्रकार कराचीच्या बाबतीत झाला. याह्यासुराची शान कराचीवरील नाविकदल व हवाईदलाच्या एकसूत्री हल्ल्यामुळे कायमची उतरली. अत्याधुनिक शस्त्रांनी व अस्त्रांनी परिपूर्ण असलेले कराची पेटून उठले होते. लाखो गॅलन पेट्रोल खलास झाले होते. खेळ युद्ध ! याह्याखाना ! आता विमानात काय अश्रू भरणार की काय !

ह्या शतकातील सर्वात मोठी आग असे वर्णन कराचीचे करता येईल ! ही अजरामर कामगिरी हंटर विमानांनी पार पाडली होती. ह्यामुळे नाविकदलाला इराणच्या सीमेपर्यंत मुसंडी मारता आली. एकही हंटर पाकी गनर्संना किंवा वैमानिकांना पाडता आले नाही. विमानतळावर सारी हंटर्स सुखरूप उतरली.

हंटर विमानांना नवी कामगिरी मिळाली. मराठ्यांचे भीमथडी घोडे एकदा अटकेपार गेले होते. राघोबाची भरारी पाहून अटक एकदा दिपली होती. आता अटकेवर हंटर्स–भराऱ्या मारणार होती. ही हटर्स–भरारी शत्रूचे पेकाट मोडून गेली.

‘ वीरचक्र विजेते ’ विंग कमांडर पारकर, फ्ला. ले. डेस्मो यांच्या हंटर्सनी ६ डिसेंबरला पाकी दिशेला उड्डाण केले. अटक परिसरातील तेलशोधक कारखाने (रिफाइनरीज) व ‘ सुई ’ गॅस प्लँट ह्या दोन्ही ठिकाणांना भारतीय हिसका दाखवायचा होता. ह्याही परिसरात विमानवेधी तोफांचा सुकाळ होता. हंटर्स त्या परिसरांत जाताच तोफा आग ओकू लागल्या. एक सेबर हवेत संचार करीत होते पण हंटर आलेली पाहताच ते कुठच्या कुठे

पळाले ! त्याचा पाठलाग करण्यास वेळ नव्हता ! बिचाऱ्याला जीवदान लाभले !

विं. क. पारकर व फ्ला. ले. डेन्मोंडनी अतिशय सुरक्षित मानल्या गेलेल्या दोन्ही प्रकल्पावर प्रचंड बॉम्ब व रॉकेट्सचा मारा केला. रिफायनरीजमध्ये ठायी ठायी विमानवेधी तोफा होत्या. पण काही वेळच त्यांनी टुरटुर केली. नंतर त्याही बंद पडल्या. पिसाट हल्ला पाहून पाकी गनर्स पळून गेले !

तोऽबा ! तोऽबा ! ही काय विमाने आहेत की सैतान ! एकही पडत नाही ! पाडले जात नाही !

विजयी हंटर्स पुन्हा त्याच दिमाखात विमानतळावर उतरली.

लगेच स्क्वा. ली. तुली, स्क्वा. ली. जगबीरसिंह, फ्ला. ले. मुखर्जी व फ्ला. ले. दीपक यादव पाकी प्रदेशात घुसले. चारी हंटर्स खैरपूरला निघाली. तिथेही सुई गॅस प्लँट होता. तेथे पोहोचताच फुसक्या पाकी तोफा आग ओकू लागल्या. हंटर्सनी कामगिरीला आरंभ केला. बॉम्ब व रॉकेट्सचा तुफानी वर्षाव गॅस प्लँटवर करून तो उद्ध्वस्त करून टाकला. आगीचे डोंब आकाशाला भिडले. आग आग. दुसरे तिसरे काही नाही.


पाकिस्तानात अगदी अंतर्गत भागात सुरक्षित समजल्या गेलेल्या या सर्व ठिकाणी सारे काही लयाला गेले. हाती उरली फक्त राख.

पाकिस्तानच्या मोक्याच्या ठिकाणची राखरांगोळी बॉम्ब हंटर्स व त्यांचे कुशल वैमानिकांनी केली होती.

आकाशात शानदारपणे संचार करणाऱ्या महाप्रतापी हंटर-वैमानिकांची ही कामगिरी जगात नेत्रदीपक ठरली आहे.

* * * *

# ५. पुण्याला धावत येईन....!



उधमपूरच्या परिसरातील एका लष्करी विमानतळावर फ्लाईंग ऑफिसर अशोक ढवळे उभे होते. पलीकडेच त्यांचे आवडते 'मिग–२१' दिमाखाने आकाशाकडे पाहात होते. नुकतेच ते विमानतळावर उतरले होते. एखाद्या गाईच्या अंगावरून तिच्या मालकाने प्रेमळ हात फिरवावा तसे क्षणभर ढवळ्यांनी आपल्या विमानाला केले. किती विलक्षण झेप होती ह्या मिग–२१ चो ! मिग–२१ ला पाहताच पळपुट पाकी वैमानिक अक्षरक्ष: पळ काढू लागले होते. आपल्याला मिग–२१ परवडणार नाही हे त्यांना कळून चुकले होते.

विमानावरून हात फिरविताना फ्ला. ले. अशोक ढवळे स्वत:शी हसले. त्यांना एकदम आपल्या प्रेमळ आईची आठवण झाली ! मागच्या खेपेला ते जेव्हा पुण्याला आले होते तेव्हा देशावर युद्धाचे सावट पसरलेले होते. पाकी हल्ल्याचा काही भरवसा नव्हता.

घरात जरा गंभीर वातावरण निर्माण झाले होते. त्यांची रजा संपत आलेली होती. एके संध्याकाळी निघताना सगळ्यांच्याच डोळ्यांत पाणी आले. आईला ते आवरेनात ! पलीकडेच त्यांची पत्नी उभी होती. वडील छायाचित्रकार बाळ ढवळे उभे होते. कठोर चेहरा करून सासरे सेतु माधवराव पगडी उभे होते. मात्र छोटा कौस्तुभ फ्ला. ले. ढवळ्यांना सोडायला तयार नव्हता. त्याला नीट बोलताही येत नव्हते. पण त्याचा आविर्भाव असा होता की "बाबा जायचं नाही हं ! एकदा तुम्ही गेलात की पुन्हा लवकर येत नाही ! मला कोण नेणार मग बाहेर ! माझ्याशी कोण खेळणार ! घरातल्या घरात मला कोण उंच फेकून झेलणार? बाबा ! तुम्ही जाऊ नका... आई एकटी असते..."

"अरे वेड्या !" फ्ला. ले. अशोक ढवळे अखेर म्हणाले, "तू बोलला नाहीस तरी मला कळालं बरं का !... आता पुन्हा आलो म्हणजे खूप दिवस राहीन हं... तुला उंच उंच आकाशात फिरवून आणीन..."

"तू नुसतं म्हणतोस प्रत्येक वेळी." त्याची आई म्हणाली, "राहात मात्र नाहीस !"

"अग आई," ते म्हणाले, "आता तूही लहान झालीस काय ? तूच असं म्हणायला लागलीस तर देशाचं संरक्षण कोण करणार? थोडीफार सेवा घडतीय माझ्या हातून ती घडू दे... एवढं युद्ध संपलं की बघ मी धावत येईन.."

त्यांना सारा प्रसंग जशाचा तसा आठवत होता. गेले दोन तीन दिवस पत्र लिहायला त्यांना वेळच मिळाला नव्हता. पाकी विमानांनी एका रात्रीत हल्ला केल्यानंतर भारतीय हवाईदल हात धुऊन त्यांच्या पाठीमागे लागले होते. पाकी वैमानिक अक्षरशः

रडकुंडीला आले होते. भारतीय विमानांचे तांडेच्या तांडे पाकी हद्दीत घुसून सारी युद्धयंत्रणा मातीमोल करू लागले होते. पण भारतीय वैमानिक व विमानवेधी तोफांचे गनर्स पाकी विमानांना भारतीय हद्दीत प्रवेशही करू देत नव्हते.

फ्ला. ऑ. अशोक ढवळे ह्याच कामगिरीवर होते. पळपुटया पाकी विमानांना सळो की पळो करून सोडत होते. पाकी विमाने दिसली रे दिसली की त्यांचे मिग–२१ हवेत झेप घेई. मिग–२१ येत आहे असे दिसताच पाकी विमाने पिसाट पळू लागत. विलक्षण धसका त्यांनी घेतला होता ह्या मिग–२१ चा.

१९६५ च्या वेळी ही विमाने नवखी होती. फारसे वैमानिकही अजून शिकून झालेले नव्हते. जे काही थोडेफार शिकले होते त्यात फ्ला. ले. अशोक ढवळे होते त्यामुळे नाव घेण्यासारखी कामगिरी त्यावेळी त्यांनी पार पाडलेली होती. मिग -२१ दिसले रे दिसले की त्यावेळी हे पाकी वैमानिक पळून जात. त्यांनी ती भीती अजून घालविलेली नव्हती. १९६५ च्या वेळीही फ्ला. ले. ढवळे संकटात सापडले होते. विमान ऐन वेळी बिघडल्यामुळे त्यांना ते सोडावे लागले होते. पॅरेशूटने त्यांनी अशा ठिकाणी उडी मारली होती की तेथून त्यांना परतायला काही दिवस लागले. तोपर्यंत ते बेपत्ता आहेत असे जाहीर करण्यात आले होते. त्यांच्या घरीही कळविले होते. साऱ्या पुण्यात ही बातमी पसरली होती. फ्ला.ऑ. ढवळे कॉलेज जीवनात स. प. कॉलेजचे उत्कृष्ट खेळाडू म्हणून गाजलेले होते. अतिशय तडफदार व धाडसी तरुण म्हणून सारे पुणेकर त्यांना ओळखीत. त्यांचे व्यक्तिमत्त्व फार लोभस व देखणे होते. हसऱ्या चेहऱ्याच्या ढवळ्यांचा मित्रपरिवार फार मोठा. उत्साहाने मुसमुसलेला अशोक एन. सी. सी.तही गाजून गेला होता. जेव्हा

ते बेपत्ता असल्याची बातमी आली तेव्हा त्यांच्या घरी लोकांची रीघ लागली. ज्याला त्याला वाईट वाटत होते. पण लवकरच ते परत सुखरूप आल्याची बातमी जेव्हा आली तेव्हा साऱ्या पुणे-करांना आनंदाचे उधाण आले. पुणेकरांनीच करावे कौतुक. फ्ला. ले. अशोक ढवळे पुण्याचे नाव हवाईदलात गाजवीत होते. पुणे-करांना याची कल्पना होती.

१९६५ च्या अनुभवामुळे ह्यावेळी फ्ला. ले. अशोक ढवळे भीमपराक्रम करून दाखवू लागले होते. क्षणाचीही उसंत त्यांना मिळत नव्हती. जवळजवळ सतत ते व त्यांचे लाडके मिग–२१ हवेतच होते. ते अशा महत्त्वाच्या विमानतळावर होते की ज्या परिसरावर याह्यासुराचा चांगलाच डोळा होता. प्रचंड सामर्थ्या-निशी तो तुटून पडलेला होता. पण त्याच्या स्वप्नाला मूठमाती देण्यासाठी भारतीय जवान व वैमानिक तय्यार होते. त्याला चांगलाच धडा मिळू लागला होता. झुंजार भारतीय वैमानिक पाकी विमाने एका पाठोपाठ पाडू लागले होते. भारतीय विमान-दलाने ह्यावेळी अशी नेत्रदीपक कामगिरी केली होती की पश्चिम आघाडीवर केवळ तीन दिवसांत पाकिस्तानची २५टक्के विमाने नष्ट करण्यात आली ! हे येरागबाळाचे काम नव्हते. त्याचा परिणाम अचूक होऊन पाकिस्तानची पायदळ आघाडी मागे पडत चालली होती. पायदळाला हवाई संरक्षण मिळत नव्हते. कारण विमाने पाडली जात. त्यामुळे वैमानिक इतके घाबरले होते की ते तयारच होत नव्हते. कराचीच्या बंदरात घुसून भारतीय नाविकदलाने व नौदलाच्या हवाईदलाने संपूर्ण कराची बंदर बेचिराख केले तरी पाकी विमानदल तिकडे फिरकले नव्हते !

फ्ला. ऑ. अशोक ढवळ्यांनी कितीतरी पाकी विमाने पळवून

लावली होती. चार डिसेंबर१९७१ पासून त्यांना क्षणाचीही उसंत मिळालेली नव्हती. १० डिसेंबरला रात्रभर त्यांना उधमपूरच्या परिसरात पहारा करावा लागला होता. सकाळी अगदी थोडा वेळ विमानतळावर त्यांना थांबावे लागले होते. तेवढ्यात त्यांनी घरी पत्र लिहिण्याचे ठरविले. घरी वाट पाहात असतील. काळजी करीत असतील. काहीतरी लिहिणे भाग आहे. खुशाली तर कळवायला हवी. वेळ फारच थोडा होता. घरगुती मजकूर लिहिल्यावर त्यांनी लिहिले,.. ...“ माझेबद्दल काही विशेष निराळे सांगावयाचे नाही. मी नेहमीप्रमाणे लढाऊ उत्साहाने मुसमुसत आहे. अगदी खूष आहे. नभोवाणीवर तुम्ही ऐकत असालच की पाकिस्तानला आम्ही सणसणीत मारा देत आहोत. ठिकठिकाणी ते पळ काढीत आहेत. आम्ही त्यांच्या पाठलागाला झेप घेतली की त्यांची विमाने लगेच माघारी पळतात. त्या पळपुट्या विमानांच्या शेपट्या पाहताना किती गंमत वाटते म्हणून सांगू ? हे युद्ध दोन तीन दिवसही टिकणार नाही. कारण तोपर्यंत पाकिस्तानात काही शिल्लक राहील असे वाटत नाही...!”

केवढा आत्मविश्वास ! केवढी जरब ! प्रत्येक भारतीय जवान व अधिकारी ईर्षेला पेटलेला होता. याह्यासुराच्या पोकळ वल्गना त्यांना नष्ट करायच्या होत्या. पाकी फौजेतील प्रत्येक शिपाई असा त्वेषाला पेटलेला नव्हता. तो प्रथम आपल्या प्राणाला जपत होता. जमलं तर हल्ला करीत होता ! परंतु पळणे प्रथम ! फ्ला. ऑ. अशोक ढवळे हे पेटलेल्या झुंजार भारतीयांचे प्रतीक समजावेत. पाकिस्तानी नीतीची व वृत्तीची प्रत्येकाला इतकी जबरदस्त चीड आलेली होती की कधी एकदा पाकी सेनेचे कंबरडे मोडतो असे प्रत्येकाला झाले होते. जो तो तुटून पडत होता. मग

काय वाटेल ते झाले तरी हरकत नाही. पंतप्रधान इंदिरा गांधींनी एक धोरण यावेळी असे ठेवले होते की लष्करी निर्णयात कोणत्याही तऱ्हेचा हस्तक्षेप करायचा नाही ! त्यामुळे लष्करी अधिकाऱ्यांनी भराभर ज्या तऱ्हेने पावले उचलली त्यात अडथळे आले नाहीत ! पश्चिम विभागाचे हवाईदल प्रमुख एअर मार्शल इंजिनियर यांनी पाकी हवाई यंत्रणा नेस्तनाबूद करण्याचा जो आदेश दिला होता तो भारतीय वैमानिकांनी तंतोतंत पाळला ! पाकी हवाईदलाचे कंबरडेच मोडले !

पत्र लिहून पुरे होत आहे तोच फ्ला. ऑ. अशोक ढवळ्यांना नवी कामगिरी मिळाली. पत्ता लिहून त्यांनी ते पोस्टात टाकण्यासाठी एका जवानाजवळ दिले. आता घरी काळजी वाटणार नाही ! आईला बरे वाटेल ! बाबांचे पत्र म्हणून चिमणा कौस्तुभ साऱ्या घरभर ते हातात धरून नाचेल !

ह्याच तंद्रीत फ्ला. ऑ. अशोक ढवळे आपल्या मिग-२१ मध्ये बसले. पाहता पाहता मिग-२१ हवेत झेपावले. पाकी विमाने आकाशात घिरट्या घालू लागली होती. त्यांना पिटाळून लावायचे होते. चारपैकी दोन पळाली. पण दोन विमानांशी फ्ला. ले. ढवळ्यांचा लपंडाव चालू झाला. ती विमाने खाली वर होऊ लागली. इकडे तिकडे आलटून पालटून जाऊ लागली. फ्ला. ले. ढवळे आता हट्टाला पेटले. तेही त्यांच्या पाठोपाठ वेडीवाकडी वळणे घेऊ लागले. आज पाकी विमाने पळून गेली नाहीत. त्यांनी काहीतरी निर्धार केलेला असावा. त्या दोन्ही पाकी विमानांनी अशी काही करामत केली की दोन्हीही एकदम मिग-२१ च्या वर गेली ! पाहता पाहता त्यांनी गोळीबार केला ! आग ओकली !

फ्ला. ऑ. अशोक ढवळ्यांचे विमान पेटले ! त्यांना भवितव्य

कळून चुकले. विमानातून त्यांनी उडी मारली नाही. पेटते विमान घेऊन त्या पळून जाणाऱ्या पाकी विमानांचा त्यांनी पाठलाग केला ! जळके विमान घेऊन पाठलाग करणारा भारतीय वैमानिक पाहून तो शत्रूही काही काल स्तिमित झाला असेल !

फ्ला. ऑ. अशोक ढवळे फार वेळ पाठलाग करू शकले नाहीत ! त्यांच्या मिग -२१ चा प्रचंड स्फोट झाला. त्या विमानाबरोबर फ्ला. ले. अशोक ढवळे गेले. ११ डिसेंबर १९७१ त्यांनी घेतलेली ती शेवटची झेप ! पुण्याचा मुसमुसणारा उत्साह उधमपूरच्या परिसरात नाहीसा झाला ! एक उमदे व्यक्तिमत्त्व देशासाठी पंचत्वात विलीन झाले


फ्ला. ऑ. ढवळ्यांच्या वीरगतीची वार्ता त्यांच्या त्या शेवटच्या पत्रापूर्वीच पुण्याला आली. आता ते परतण्याची वेडी आशाही नव्हती.

एवढं युद्ध संपले की धावत पुण्याला येईन असे म्हणणारे फ्ला. ऑ. अशोक ढवळे आता पुण्याला कधीच येऊ शकणार नव्हते. आपल्या छोटया कौस्तुभला हवेत कधीच फिरवून आणू शकणार नव्हते. आपल्या एकुलत्या एका पोराच्या पाठीवर फ्ला. ऑ. ढवळ्यांची आई आता कधीच मायेचा हात फिरवू शकणार नव्हती.

फ्ला. ऑ. ढवळ्यांनी पुण्याची विजयी परंपरा पाळली होती. पुण्याचा पराक्रम उत्तरेत पुन्हा एकदा दिसला होता. मराठ्यांचा हा महापराक्रम भारताची शान वाढविण्यास कारणीभूत ठरणार होता.

* * * *

# ६. मुक्तिवाहिनीमुळे मुक्तता !



" आकाशवाणी "

" आज संध्याकाळी पाकिस्ताननं भारताच्या बारा लष्करी विमानतळांवर एका पाठोपाठ अचानक हवाई हल्ले करून ते उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. श्रीनगर, अवंतिपुरा, पठाणकोट, अमृतसर, फरीदकोट, उत्तरलाई, फिरोजपूर, जालंदर वगैरे ठिकाणी फारसे नुकसान झालेले नाही. धावपट्टीला एखाद्‌दुसरा खड्डा एखाद्या विमानतळावर पडला..."

स्क्वाड्रन लीडर के. डी. मेहरा वातम्या ऐकत होते. तीन डिसेंबरचे रात्रीचे आठ वाजले होते. ते रजेवर नव्हते. परंतु सहज वेळ मिळाला होता म्हणून कलकत्याला वहिणीकडे आले होते. एकदम इतक्या प्रचंड प्रमाणात हल्ला होईल अशी त्यांना कल्पना नव्हती. त्यांना तातडीने निघणे जरुरीचे होते. विमानतळावर उपस्थित असणं आवश्यक होतं. ते याच क्षणाची वाट पाहात होते, युद्ध सुरू झाले की त्यांना शत्रूवर तुटून पडायचे होते.

“ भय्या ” त्यांची बहीण निघताना म्हणाली, “ जपून राहा. कालीमातेचं स्मरण कर. ”

“ अगं, वेडे ” ते हसून म्हणाले, “ कालीमातेचं स्मरण जरूर करीन...पण तू जपून राहा म्हटलंस ना ? तेवढं जमणार नाही ! एकदा विमान हवेत उडालं की आम्ही आमचे राहात नाही.. आम्ही देशाचे बनतो. जगलो तर देशासाठी...मेलो तरीही देशासाठी ! ”

स्क्वा. ली. के. डी. मेहरा तडक विमानतळाकडे आले. रात्रभर ते तेथेच होते. हुकमाची वाट पाहात होते. पश्चिम आघाडीवर रात्रीच भारतीय विमान हल्ले चालू झाल्याचे त्यांना समजले होते. पण बांगलाच्या बाबतीत सरकार सारी पावले जपून टाकीत होते.

४ डिसेंबरला सकाळी हुकूम मिळाला. स्क्वा. ली. मेहरा तयारच होते. त्यांना डाक्क्यावर हल्ला करायचा होता. तेथील विमानतळ नष्ट करायचा होता. तो तेवढाच विमानतळ महत्त्वाचा होता. त्यांच्या जोडीला फ्लाईट लेफ्टनंट मोने होते. दोघांची ‘ हंटर ’ बॉम्बर विमाने एकदम हवेत झेपावली. डाक्क्याच्या दिशेने निघाली. ते अगदी खालून चालले होते. त्यामुळे रडारवर त्यांची विमाने दिसू शकणार नव्हती. डाक्क्याच्या विमानतळावर काही सेबरजेट उभी होती. दोघांनीही जोराचा हल्ला करून ती जागच्या जागी नष्ट करून टाकली. धावपट्टीवर व इतरत्र बॉम्ब टाकून ते जरा वळले नि त्यांना दोन सेबरजेट हवेत दिसली. ती फ्ला. ले. मोन्यांच्या विमानामागे होती. स्क्वा. ली. मेहरांनी फ्ला. ले. मोन्यांना तातडीने सावध केले. त्यांचे विमान धोक्यात होते. आता ते स्वत: एका सेबरजेटच्या पाठीमागे लागले. काही क्षणातच ते जवळ गेले व गोळ्या झाडल्या. पाहता पाहता सेबरजेट पेटले ! आगीचा प्रचंड लोळ खाली पडला.

पण स्क्वा. ली. मेहरांच्या 'कॉकपीट' मध्येही धूर निघू लागला. त्यांना कळेना की धूर कसा येऊ लागला? बहुतेक विमानवेधी तोफेचा गोळा लागला असावा. त्यांना कळले नाही. त्यांनी एक विशिष्ट झडप उघडली. धूर बाहेर जाऊ लागला. त्यावेळी ते अगदी जमिनीजवळ केवळ '१०० फुटांवर होते. दुसरे सेबरजेट त्यांच्या दिशेने वेगाने येत होते. त्यांच्या विमानातून चांगलाच धूर निघत होता. हवेत एक धुराचा पट्टाच निर्माण झाला होता. सेबरजेटच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करायला हवा होता. विमान तर जखमी झालेले होते. ते एकदम खाली आले. पाहता पाहता वळले. परंतु आता मात्र त्यांच्या विमानाला आग लागली होती. काही वेळातच स्फोट झाला असता. जळके विमान घेऊन ते एकदम दूरवर गेले. पॅरेशूट घेऊन त्यांनी उडी मारली. त्यांचे पॅरेशूट लवकर उघडले नाही. ते उघडले व ते जमिनीवर जोराने आपटले. ते हातावर पडले. त्यामुळे हाताला जबरदस्त वेदना होऊ लागल्या होत्या. बराच वेळ ते त्या ठिकाणी बेशुद्ध पडले होते. त्यांनी उडी मारल्याक्षणीच विमानाचा प्रचंड स्फोट झाला होता. ते थोडक्यात बचावले. त्यांच्या बहिणीने सांगितल्याप्रमाणे त्यांनी त्यावेळी खरोखरच कालीमातेचे स्मरण केले होते.

ते ज्या ठिकाणी पडले ते एक तांदुळाचे शेत होते. त्यांना पडलेले पाहताच शेतातून शुजीव धावत आला. तो 'मुक्तिवाहिनीत' होता. बांगलामधील पाकी अत्याचारांचा कळस झाला होता. माणुसकीला काळिमा लावणारी कितीतरी कृत्ये सर्रास तेथे चालू होती. 'बिहारी मुसलमानांच्या' साह्याने पाकी सेना सारे अत्याचार करीत होती. त्याला प्रतिकार करण्यासाठी बंगाली

मुसलमानांनी ‘ मुक्तिवाहिनी ’ स्थापन केलेली होती. तिचे सभासद साऱ्या बांगलात पसरलेले होते. पाकी सेनेला बेजार करण्याचे तिचे काम चालू होते. ही मुक्तिवाहिनी पाकी सेनेला सळो की पळो करून सोडत होती. शुजीब हा एक कॉलेजकुमार होता. केवळ एकवीस वर्षांचा. डाक्क्याच्या परिसरात त्याला मुक्ति-वाहिनीचे काम मिळाले होते.

शुजीबने जवळ जाऊन पाहिले. स्क्वा. ली. मेहरा बेशुद्ध होते. जवळच्या पाटातील पाणी त्याने त्यांच्या तोंडावर टाकले. काही क्षणातच स्क्वा. ली. मेहरा शुद्धीवर आले.

“ मी कुठे आहे ” त्यांनी विचारले.

“ साहेब ” शुजीब म्हणाला, “ तुम्ही सुखरूप आहात. काळजी करू नका. मी मुक्तिवाहिनीचा स्वयंसेवक शुजीब आहे. आता आपल्याला घाई करायला हवी. पाकी सैतान तुम्हाला हुडकायला येतीलच. ”

शुजीबने शेतकऱ्याच्या वस्तीतून बंगाली पोशाख आणला व स्क्वा. ली. मेहरांना दिला. त्यांचे कपडे दगड बांधून विहिरीत फेकले. बंगाली पोशाखामुळे स्क्वा. ली. मेहरांचे सारे स्वरूप बदलून गेले. त्यांचे नाव ‘ कादीर अहमद ’ ठेवण्यात आले. ते बंगाली शेतकरी वाटू लागले. बेमालूम काम झाले. तेथे थांबणे धोक्याचे होते. शुजीब त्यांना एका सुरक्षित ठिकाणी लगेच घेऊन गेला. ते जाताच पाकी सैनिक त्या ठिकाणी स्क्वा. ली. मेहरांना शोधण्यास आले. त्यांनी सगळीकडे बारकाईने पाहिले. आसपासच्या झोपड्यान् झोपड्या तपासल्या. लोकांना उगाचच मारहाण केली. पण कोणी काहीही सांगितले नाही. लोकांनी कानांवर हात ठेवले. शिपायांनी जंगजंग पछाडले. ते निघून गेले.

विमान पडलेल्या ठिकाणापासून पाच सहा मैल दूर असलेल्या खेड्यात नेले. याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्यावरील संकट संपले. भारतीय वैमानिक डाक्क्याच्या परिसरात पडला आहे हे पाकी सेनेला माहीत होते त्याला हुडकण्यासाठी ते जिवाचे रान करायला तयार होते.

'मोशोनी खोला' नावाच्या खेड्यात रात्री शुजीव स्क्वा.ली. मेहरांना–नव्हे 'कादीर अहमद' ला घेऊन आला. एका आड बाजूच्या घरात एक तळघर होते. तेथे दोन दिवस 'कादीर' ला ठेवले. मुक्तिवाहिनीच्या एका डॉक्टरने त्या दोन दिवसांत 'कादीर' ची चांगलीच देखभाल केली. वेदनाशामक इंजेक्शन्स दिली. त्यांच्या हाताला निरनिराळी औषधे चोळली. गोळ्या दिल्या. त्यामुळे कादीर अहमदला थोडे बरे वाटू लागले. अजूनही त्यांना नीट चालता येत नव्हते. त्या रात्रीच बातमी आली की एका भारतीय वैमानिकाला हुडकून काढण्यासाठी पाकी शिपाई येत आहेत. त्या गावाला फारशी कल्पना नव्हतीच. त्यामुळे सारे गावकरी प्रतिकाराला तयार झाले. त्यांचे म्हणणे असे की गावात कुणी परकीय इसम आलेला नाही. परंतु सैनिक त्या गावाकडे न येता शेजारच्या गावाकडे वळले. तरी पण शुजीबने कादीरला एका मच्छीमारी बोटीत नेऊन बसविले होते.

शेजारच्या त्या गावाहून सैनिक निघून जाताच त्याच गावात शुजीवने कादीरला नेऊन ठेवले ! ते गाव आता चांगलेच सुरक्षित होते. काही धोका नव्हता.

सहा डिसेंबरला कादीरला पुन्हा त्या गावातून हलविले गेले. शुजीबच्या मदतीला अजून सरवर आला होता. तो होता अठरा वर्षांचा. पण होता अगदी दणकट. त्यामुळे मोठा वाटायचा. त्या

दोघांनी कादीरला वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. किती तरी युक्त्या केल्या. रात्रभर जागत राहिले. बराचसा प्रवास रात्री नावेतून व्हायचा. सैयदपूर आल्यावर त्यांनी जरा मोठी नाव घेतली. ते गावात गेलेच नाहीत. रात्रभर त्या नावेतच राहिले. गावात तशी सुरक्षितता नव्हती. पाकी सैनिकांना शंका येईल असे वागायला नको होते. सारी काळजी ते दोघे व्यवस्थित घेत होते. डोळ्यात तेल घालून कादीरचे रक्षण करीत होते. कादीरला भारतीय हद्दीपर्यंत टप्प्या टप्प्याने नेऊन सोडणे त्यांनी आपले कर्तव्य मानले होते. त्यासाठी ते जिवाचे रान करीत होते.

पहाटे ते पलीकडच्या गावी गेले. ते गाव खास मुक्तिवाहिनीचे होते. तेथे मुक्तिवाहिनीचा कमांडर राहात होता. शुजीबने अगोदर जाऊन कादीरची हकीकत सांगितली. मग ते सारे गावात शिरले. मुक्तिवाहिनीच्या कमांडरनी व गावकऱ्यांनी कादीरचे स्वागत केले. गावकऱ्यांना आनंद झाला. कादीरची खास व्यवस्था गावकऱ्यांनी केली. जो तो त्यांची चौकशी करीत होता. काळजी घेत होता. प्रत्येकाची एकच उत्सुकता होती. भारतीय जवान आमच्या गावात कधी येणार ? आम्हाला स्वातंत्र्य कधी मिळणार ? मुजीब कधी सुटतील ?

" दोस्तो " कादीर म्हणाला, " तुम्ही अजीबात काळजी करू नका. भारतीय जवानांची आगेकूच सारखी चालूच आहे. आज ना उद्या तुम्हाला स्वातंत्र्य मिळणार याची खात्री बाळगा. आमच्या पंतप्रधानांनी तसे घोषित केले आहे. मुक्तिवाहिनीच्या सहकार्यामुळे स्वातंत्र्य जवळ येत आहे.... "

गावकऱ्यांना मनस्वी आनंद झाला. त्यांनी घोषणा केल्या.

" मुजीब रेहमानकी . जय... !

" इंदिरा गांधीकी....जय... ! "

गावकऱ्यांनी कादीरला मग पाकी सैनिकांच्या अत्याचारांची कथा सुनावली. एकेकजण त्वेषाने सांगत होता. कादीरला आश्चर्याचे धक्के बसत होते. हिटलरने ज्यूंवर केलेले अत्याचार काहीच नाहीत. याह्यासुराच्या नरासुरांनी बांगलात अक्षरशः नरक निर्माण केला होता. ' सोनार ' बांगलाची शान घालविली होती. त्या गावातही बेसुमार अत्याचार झाले होते. हे सांगताना लोकांच्या डोळ्यांत पाणी तरारत होते. इथे मानवता रडत होती.

ते गाव सोडताना कादीरलाही हुंदका आवरेना ! गावकऱ्यांनी फार प्रेम निर्माण केले होते. त्यांनी कादीरला सुयश चिंतिले. ' जोय बांगला ' च्या घोषणा केल्या... ' भारत–बांगला झिंदाबाद ' च्या घोषणा दिल्या.

ह्या गावातून त्या गावात. त्या गावातून अन्य गावात. कादीर-शुजीब व सरवरची यात्रा चालू होती. पाकी सैनिकांना कुठेही चुकून कधी शंका आली नाही. कादीरला अजून म्हणावे तसे बरे वाटत नव्हते. अंगाचा ठणका अजून होताच.

सारेजण नावेतून चालले होते. कालीपूरजवळ मेघना नदी ते पार करीत असतानाच दोन पाकी गनबोटींनी त्यांना घेरले. त्या भारतीय वैमानिकाच्या शोधात असाव्यात ! शुजीबने नाव जोरात हाकलण्यास आरंभ केला. गनबोटीही वेगाने त्यांचा पाठलाग करू लागल्या. गनबोटीनी आता गोळ्यांचा वर्षाव केला असता !

पण पुन्हा ' कादीरने ' कालीमातेची प्रार्थना केली ! काय योगायोग असेल कुणास ठाऊक ! अचानक चार भारतीय ' हंटर ' विमाने तेथे आली व त्यांनी त्या दोन गनबोटी बुडविल्या !

आता त्यांच्या प्रवासाचा अखेरचा भाग चालू होता. भारतीय

जवानांनी वेढल्यामुळे पाकी सेना चारी बाजूंनी पळत सुटली होती. पळता पळताही गावागावांतून त्यांचे अत्याचार चालूच होते. पटापट माणसे मारून ते पळपुटे पाकी पळून जात होते. त्यामुळे शुजीबला आता विशेष काळजी वाटू लागली होती. कारण आता त्यांना चालतच पुढे जायचे होते.

पण कादीरचे भवितव्य चांगले होते ! त्यांना वाटेतच एक भारतीय जवानांची जीप भेटली. त्या जोपने त्यांना सुरक्षित ठिकाणी नेऊन सोडले व पुढील व्यवस्था केली.

शुजीब व सरवरच्या संगतीत आता ही शेवटची रात्र होती. स्क्वा. ली मेहरांना त्यांचे आभार कसे व किती मानावेत हे सुचेना. ते दोघे भेटले नसते तर ? तर हा दिवस उगविला नसता ! त्यांची सुटका झाली नसती.

भल्या पहाटेस हवाईदलाचे हेलीकॉप्टर त्या ठिकाणी आले ! स्क्वा. ली. मेहरा त्यात बसल्यावर शुजीब व सरवर खरोखरच रडू लागले ! चार दिवसांत त्यांनी केवढे प्रेम निर्माण केले होते ! केवढी माणुसकी दाखविली होती. त्यात मग जातपात, देशधर्म काही काही आडवे आले नाही !

“ दोस्तो ” स्क्वा. ली. मेहरा त्यांना म्हणाले, “ तुमचे उपकार मी कधीही विसरणार नाही. माझ्यासाठी तुम्हाला फार त्रास झाला. तुमचा देश स्वतंत्र झाला की तुम्हाला चार दिवस माझ्या घरी नेण्यासाठी मी खास तुमच्यासाठी येईन... !


जोय भारत .... जोय बांगला .... ! ”

हेलीकॉप्टर हवेत झेपावले. पाहता पाहता दूर गेले.

शुजीब व सरवर कितीतरी वेळ त्याकडे पाहात होते.... अगदी दिसेनासे होईपर्यंत !

* * * *

# ७. विमानाची झाली चाळणी



पाकिस्तानी हवाई हद्दीत कधी नव्हे ती प्रचंड धमाल उडाली. भारतीय विमानांचे तांडेच्या तांडे मधमाश्याचे पोळे उठल्यासारखे वेगाने पाकी हद्दीत घुसू लागले होते. सीमेवरची पाकी सेना गडबडून जाऊ लागली. त्यांच्या डोक्यावरून सतत विमाने चालली होती. विमाने तरी किती प्रकारची ! जाणकार पाकी अधिकाऱ्यांना नॅट माहीत होती. ती उंचावरून चालली होती. ऐटबाज कॅनबेरा व हंटर मोठ्या दिमाखाने चालली होती. कॅनबेराच्या शेपटीचा ढंग खालून मोठा रमणीय दिसत होता. अरे हे काय ? ह्या विमानाचा पुढील भाग किती निमुळता व टोकदार आहे ! आणि पंखही दिसत नाहीत. शेपटीचा भाग किती उंच व पाठीमागे छोटे पंख आहेत ! किती विलक्षण झेप ... अरेच्या ही 'मिग २१' दिसत आहेत ! आणि ही पिसाटासारखी कोणती विमाने गेली ? खालून किती छान दिसताहेत ! पुढील इंजिनाची व पंखांची

रचना किती मनोहारी ! ध्वनीपेक्षाहि अधिक गतीत चाललीत ही ! आता पाकिस्तानचे काय होणार कुणास ठाऊक ! विलक्षण तऱ्हेने बॉम्ब्स टाकणारी ती ‘ मिस्टिअर ’ होती.

कमाल आहे ! हा तांडा काही वेगळाच दिसत आहे ? विमानाची रचनाहि नव्या तऱ्हेची दिसत आहे. पाकड्यांनो तुम्हाला ही विमाने अजून नवीन आहेत ! आता पाहा ह्यांचा भीमपराक्रम ! रशियन डिझाईनची ही आहेत ‘ एस. यू–७ ’ – सुखोई ७ – ह्या फायटर–बॉंबर विमानांची आता करामत पाहाच ! तुमच्या त्या मस्तवाल विमानतळांची आता काही खात्री नाही ! तुमची ती ‘ मिराज ’ व सेबरजेटही पळत सुटतील · · · !

विंग कमांडर एच. एस्. मंगत ह्या विलक्षण गतिमान ‘ सुखोई –७ ’ विमानांचा तांडा घेऊन चालले आहेत. पाकिस्तानने हल्ला करायचा अवकाश की भारतीय विमाने पाकी लष्करी केंद्रावर व लष्करी विमानतळावर अविरत बॉम्ब्स टाकू लागली होती. दृष्ट लागावी अशी कामगिरी भारतीय वैमानिकांनी करण्यास आरंभ केला होता.

विंग कमांडर मंगतना पाकिस्तानच्या ‘ चंदेरी ’ ह्या लष्करी विमानतळावर हल्ला करायचा होता. तो विमानतळ येताच त्यांनी असा काही तडाखेबंद हल्ला केला की काही क्षणातच त्या विमानतळाची धावपट्टी होती का नव्हती अशी झाली. नीटस व सुरेख दिसणारा विमानतळ ओबड धोबड दिसू लागला. विमानतळावरील विमानवेधी तोफांची आग न जुमानता विंग कमांडर मंगतनी तेथील सारी यंत्रणा नष्ट करून टाकली. पाहता पाहता ‘ चंदेरी ’ विमानतळ नेस्तनाबूत झाला ! विमानवेधी तोफांनी सर्व कोनांनी तोफा डागल्या परंतु त्यांच्या एकाही गोळ्याला विमानाने

दाद दिली नाही. विंग कमांडर मंगत अशा काही चपळाईने विमान अगदी खालून नेत होते की कितीही काळजीपूर्वक कोन लावला तरी विमानवेधी तोफांचा नेम चुकत होता. पाकी गनर्स इतके कुशल होते की भारतीय वैमानिकांची गती पाहूनच ते भांवावून जात.

अपेक्षित कामगिरी पूर्ण होताच विं. क. मंगत यांचे 'एस्. यू.–७' विमान हवेत झेपावले ! त्यांनी विमानतळाकडे अखेरची दृष्टी टाकली ! सगळीकडे आगच आग दिसत होती. हवाई नियंत्रण केंद्र चारी वाजूंनी पेटून निघाले होते.

विं. क. मंगत स्वतःशीच हसले. अपोलो–१५ हे अमेरिकन अंतराळयान जेव्हा चंद्रावर उतरले होते तेव्हाचे सारे फोटो त्यांनी नुकतेच पाहिले होते. चंद्रावर सगळीकडे विलक्षण खड्डे होते. दुरून मोहक वाटणारा चंद्र अगदी खडबडीत होता. हा 'चंदेरी' विमान-तळही अगदी चंद्राप्रमाणेच शोभून दिसत होता ! सगळीकडे खड्डे ! खड्डेच खड्डे !

'सुखोई–७' पाकी हद्दीतून सुस्तपणे चालले होते. दिमाखात ! ऐटीत ! तोच विं. क. मंगतना काहीतरी गडबड आहे असे वाटले. त्यांनी बारकाईने पाहिले. त्यांचा पाठलाग होत होता ! फ्रेंच बनावटीची व पाकिस्तान ज्यांना अजिक्य समजत होता अशी दोन 'मिराज' विमाने त्यांच्या पाठीमागे होती. विं. क. मंगतनी दुसरे तिसरे काहीही न करता विमानाचा वेग वाढविला. विलक्षण गतीने सुखोई–७ निघाले !

'मिराज' विमानांचे वैशिष्टय हे आहे की ती जवळ आली की हवेत अशी काही शक्ती निर्माण करतात की पुढील विमानातील वैमानिकाचा गोंधळ उडतो ! त्याचे कोणतेही मीटर व्यवस्थित

काटा दाखवीत नाही. बॉम्ब टाकण्याचा कोन बरोबर येत नाही. सारा हिशेब चुकतो! विशिष्ट विद्युत्-लहरीमुळे हे शक्य होते. ते विमान जवळजवळ निरुपयोगी होते. त्यामुळे ते पाडणे 'मिराजला' शक्य होते. वि. ग. मंगतना याची पुरेपूर कल्पना होती! पाकी वैमानिकांना मात्र ह्या रशियन 'सुखोई–७' ची काहीच माहिती नव्हती! कल्पना नव्हती. ती असती तर त्यांनीं पाठलाग केलाच नसता. त्या 'मिराज' नी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. कमाल वेग वाढविला. पण विं. क. मंगत यांचे 'सुखोई–७' त्यांना पाडता आले नाही! भारताची हद्द येताच ती भित्री मिराज पळून गेली.

विं. क. मंगत विमानातून उतरले तेव्हा त्यांच्या मित्रांनी विमानाला गराडा घातला! हास्यानंदात सारे वातावरण भरून गेले. त्यांनी विमान संकटात असल्याचा संदेश दिलेला होता. त्यामुळें विमानतळावर थोडी काळजी निर्माण झालेली होती. परंतु काही क्षणातच त्यांनी पुन्हा सांगितले होते की 'शत्रू पळून गेला!' होय, खरं आहे. अक्षरशः शत्रू पळून गेला होता. भेकड! भ्याड!

दुसऱ्या दिवशी विं. क. मंगतना नवी कामगिरी मिळाली. कामगिरी म्हटलं तर कठीण होती. पण भारतीय वैमानिकांना त्यावेळी कोणतीच गोष्ट अवघड वाटत नव्हती. कसलीही गोष्ट केव्हाही करण्यास ते तयार होते. रात्र नाही दिवस नाही. कशाचेही बंधन नव्हते. चोवीस तास त्यांचे काम चालूच होते. विश्रांती हा शब्दही दुर्मिळ झालेला होता!

अतिशय खालून उड्डाण करून शत्रूची युद्धयंत्रणा त्यांना आता नष्ट करावयाची होती. पश्चिम आघाडीवर शत्रू पुरत्या बंदो बस्तानिशी तयार होता. ठिकठिकाणी मोर्चे बांधलेले होते. ठाणी

उभारली होती. प्रचंड तोफा -रॉकेट्स तयार होती. याचा निकाल लावायचा होता. त्याची ही शक्ती नष्ट करायची होती. शत्रू चांगलाच सावध होता. ठिकठिकाणी आग ओकणाऱ्या विमानवेधी तोफा तयार होत्या.

विं. क. मंगत निघाले. त्यांच्यासमोर नकाशा तयार होता. शोधक विमानांनी बरोबर हेरगिरी केलेली होती. अगोदर उंचावरून फिरून विं. क. मंगतनी सारी पाहणी केली. योजना आखली. ते एकदम खाली आले. एके ठिकाणी भारी तोफा लावून ठेवलेल्या होत्या. त्या पाहता पाहता त्यांनी खलास करून टाकल्या. पाकी गनर्स व अधिकारी पाहातच राहिले. विमान इतके बेधडक खाली येऊन हल्ला करून जाते ! खरे,वाटेना ! त्या वैमानिकाला भीती कशी वाटली नाही ? विमानवेधी तोफांना तो भ्याला कसा नाही ? शत्रूच्या हद्दीत इतक्या खाली येऊन हल्ला ! ह्या विचारात ते पाकी गनर्स असतानाच ते भारतीय विमान पुढेच थोड्याच अंतरावर एकदम खाली आले. व तेथील तोफा बंद पाडून परत सोसाट्याने वर गेले. विं. क. मंगत अशा काही चपळाईने हालचाली करीत होते की शत्रूही स्तिमित झाला.

ते अजून पुढे गेले. तेथेही एका ठाण्यावर त्यांना हल्ला करायचा होता. पण तेथील विमान-विरोधी तोफ गोळे ओकू लागली होती. ते ठाणे सावध होते. विं. क. मंगतनी क्षणभरही विचार न करता एकदम त्या ठाण्यावर हल्ला केला ! लांब पल्ल्याच्या तोफा नष्ट झाल्या. परंतु त्यांच्या विमानाच्या शेपटीवर एक गोळा अचूक बसून ती तुटली. विमानाला प्रचंड हादरा बसला. सुटत चाललेला तोल त्यांनी सावरून वर उड्डाण केले. एखादा लगेच परतला असता ! जिवाला घाबरून पळाला असता.

येथे जर पाकी वैमानिक असता तर त्याने पॅरेशूटने उडीच मारली असती.

पण विं. क. मंगतना कसली भीती म्हणून वाटत नव्हती. परत फिरायचे तर त्यांच्या मनातही नाही आले. लहानपणापासून त्यांना ही सवय होती. कोणतीही गोष्ट अर्धवट टाकून पळून जाण्याचे त्यांच्या स्वभावातच नव्हते. हाती घेतलेली गोष्ट पूर्ण व्हायलाच हवी. अजून राहिलेल्या तीन चार ठाण्यांवर त्यांनी वारंवार हल्ले केले. प्रत्येक वेळा त्यांना अगदी जवळ येऊन हल्ला करावा लागत होता. त्यामुळे विमानवेधी तोफांचे अजून काही गोळे त्यांच्या विमानाला बसून त्याची अगदी चाळणी होण्याची वेळ आली विमानाचे काही भाग तुटल्यामुळे विमानावरील त्यांचा ताबा सुटत चालला होता. त्याचा परिणाम गतीवर होत होता. वजन कमी झाल्यामुळेही फार सावधगिरी बाळगावी लागत होती. पण विं. क. मंगतनी याची फिकीर न करता आपले उद्दिष्ट पार पाडले.

भोके पडलेले व शेपटी तुटलेले विमान त्यांना आता परत न्यावयाचे होते. शिवाय शत्रूच्या विमानाकडून पुन्हा पाठलाग होण्याची शक्यता होती. अशा परिस्थितीत त्यानी नियंत्रण केंद्राला संदेश दिला. 'भारतीय हद्दीत येऊन पॅरेशूटने उडी टाका··· विमान सोडून द्या' असा संदेश मिळाला,

विं. क. मंगत स्वतःशी जरा हसले. ही गोष्ट त्यांना करायची नव्हती. आपले लाडके विमान जरी जखमी झाले होते तरी ते त्याला सोडून जाणार नव्हते. त्याने महत्त्वाची कामगिरी पार पाडलेली होती. त्याला काम झाले की सोडणे त्यांना पसंत नव्हते.

त्यांनी निर्धार केला. चाळणी झालेले विं. क. मंगतांचे विमान शत्रूच्या हद्दीतून फार सावधतेने बाहेर पडले. भारतीय हद्दीत


येताच त्यांनी वेग वाढविला. विमानतळावर जेव्हा ते घिरटचा घालू लागले तेव्हा साऱ्या विमानतळावर आश्चर्याची लाट पसरली. शेपूट तुटलेले व चाळणी झालेले विमान परत आणले ! हा एक विक्रमच होता. येरा गबाळाचे हे कार्य नव्हते. ही साधीसुधी घटना नव्हती ... !

असे विक्रम ... असा पराक्रम फक्त भारतीय वैमानिकच करू शकतात हे जगाला मान्य करावे लागले !

* * * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ना. क्र. ९६२४० नों. दि ...
वि. ग्रा. वा. ...

## ८. नवा विक्रम



७ डिसेंबर १९७१. बांगलाची आघाडी. सिल्हटचा परिसर. भारतीय जवानांनी पाकी फौजांना डाक्क्याकडे ढकलत नेण्यास आरंभ केलेला आहे. सर्व आघाड्यांवर पाकी फौजांची पीछेहाट चालू आहे. जन. नियासी हा पाकी सेनापती पोकळ दम भरीत आहे. वाट मिळेल तसे पाकी सैनिक धावत पळत सुटले आहेत. आडवाटेला पांगलेले आहेत. मुक्तिवाहिनीचे जवान ते त्या पळपुट्या पाकी जवानांचा समाचार घेत आहेत. त्यामुळे खवळून पुन्हा पाकी फौजांनी ऐतिहासिक अत्याचार वाढविले आहेत.

सिल्हटमध्ये एक नवा प्रयोग होत आहे. भारतीय लष्कराच्या इतिहासात प्रथमच नवी घटना घडत आहे. सिल्हटमध्ये कारवाई करण्यासाठी तातडीने जवानांची गरज आहे. त्या भागाचे पायदळ प्रमुख ले. ज. जगजितसिंग अरोरांनी नवा व्यूह रचलेला आहे. एका पाठोपाठ हेलीकॉप्टर्स सिल्हट परिसरात उतरत आहेत

त्यातून भारतीय जवान दारूगोळा घेऊन पटापट उतरत आहेत. हिरव्यागार शेताशेतांमधून ही हेलीकॉप्टर्स उतरत आहेत.

हेलीकॉप्टर्सचा हा तांडा आणीत आहेत. ग्रुप कॅप्टन चंदनसिंह व त्यांचे सहकारी. सिल्हटजवळ हेलीकॅाप्टर्स येताच पाकी तोफा आग ओकू लागल्या. ग्रुप कॅ. चंदनसिंह व त्यांच्या सहकाऱ्यांनी रॉकेट्स व मशीनगन्सच्या साहाय्याने तोफा तर बंद पाडल्याच पण काही गनर्स व सैनिकही ठार मारले. साधे हेलीकॉप्टरही पाकी गनर्सना पाडता आले नाही. रॉकेट्सचा मारा इतका तडाखेबंद झाला की शत्रूचे काही चालले नाही. उलट पाकी फौज पळू लागली. हेलीकॉप्टरमधून मशीनगन्सचा मारा त्यांना नवीन होता ! तो चुकविता येत नव्हता.

हेलीकॉप्टर युनिटने ह्या युद्धात विलक्षण कामगिरी केली. शत्रूच्या गोळीवाराला न भिता २००० सैनिक व १०० टन दारूगोळा एकट्या सिल्हट भागात काही वेळातच उतरविला. अशी कारवाई ह्या युद्धात प्रथमच करण्यात आली. ह्याशिवाय बांगला आघाडीवर मालवाहू विमानांनीही हजारो भारतीय जवान व प्रचंड दारूगोळा उतरविला होता. पण हेलीकॉप्टरची किमया लक्षात राहण्यासारखी होती. ह्या पराक्रमाला तोड नव्हती. भारतीय हवाईदलाच्या शौर्याची ही कमाल समजावी लागली. सिल्हटमध्ये अशा तऱ्हेने तातडीने जवान उतरवून मुक्तिवाहिनीच्या मदतीने सिल्हटची मुक्तता करण्यात आली. ह्या शिवाय हेलिकॉप्टर युनिटसारखे ड्यूटीवर होते. तातडीची विविध तऱ्हेची मदत आघाडीच्या कोणत्याही भागात हेलीकॉप्टर्स बेधडक नेत होती. जखमी सैनिकांना हेलीकॉप्टरमधून तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करता येत होते. मृत सैनिकही हेलीकॉप्टर्सनी उचलून आणले.

१० डिसेंबरला मेघना नदीवरील ‘भैरव बाजार’ येथे पाकी फौजांनी तुंबळ युद्ध केल्यामुळे अजून भारतीय जवानांची कुमक आवश्यक होती. हे कार्य विमानाने होणार नव्हते. जीप्सनी होणार नव्हते. कारण बांगलामध्ये सगळे नद्यांचे जाळे आहे. कितीतरी पूल मुक्तिवाहिनीने व पाकी फौजांनी नष्ट केले होते. फक्त हेलीकॉप्टर्सच उपयोगी होते. त्यांनी ही कामगिरी स्वीकारली. ग्रुप कॅ. चंदनसिंहांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ऐनवेळी शेकडो भारतीय जवान मेघना नदीजवळ उतरविले. त्यामुळे युद्धाचे चित्र एकदम पालटले.

पायदळाची सारी आघाडी बांगलात ह्या हेलीकॉप्टर्सनी सांभाळली. त्यामुळे पायदळाचा आत्मविश्वास वाढला. रात्री बेरात्री देखील हेलीकॉप्टर्सनी कशालाही दाद न देता कर्तव्यपूर्ती केली. एका रात्रीत ‘आशुगंज’ आघाडीवर १२०० जवान उतरविले. शिवाय १०० टन दारूगोळा.

पश्चिम आघाडीवरही हेलीकॉप्टर्सनी लक्षात राहील अशी कामगिरी केली. फ्ला. ले. शर्मा ‘बारमेर’ आघाडीवर आपल्या हेलीकॉप्टरमधून भारतीय जवान घेऊन चालले होते. तोच चार सेबरजेट एकदम आकाशात आली ! आता कठीण प्रसंग होता. परंतु फ्ला. ले. शर्मांनी त्या सेबरजेट्सना अशा काही वेड्या-वाकड्या हुलकावण्या दिल्या की सेबरजेट्स त्यांच्या जवळच येऊ शकली नाहीत. एकाने प्रयत्न करताच त्यांनी मशीनगन चालू केली. सेबर लांब पळाले !

बारमेर भागात याह्याखानाने प्रचंड धडक दिली होती. त्यामुळे आघाडीवरच्या जवानांना वाटेल त्या तऱ्हेची मदत फ्ला. ले. शर्मा हेलीकॉप्टरने करीत होते. राजस्थानातील ह्या आघाडीवर जवानांना पाणीही पिण्यास मिळत नसायचे. फ्ला. ले. शर्मांनी

कितीतरी वेळा तहानलेल्या जवानांना अमृतासारखे पिण्याचे पाणी पुरविले ! केवढी ही काळजी. आत्मीयता.

त्याच भागात एका लहानशा ठाण्यासाठी पाकी सैनिक निकराने लढत होते. मशीनगन्समुळे भारतीय जवानांना ते ठाणे काबीज करता येत नव्हते. भारतीय जवान त्या मानाने कमी होते. शत्रूची संख्या चांगलीच मोठी होती. फ्ला. ले. शर्मा दारूगोळा घेऊन चालले होते. त्यांना हे दृश्य दिसताच ते पटकन खाली आले व मशीनगन्सचा त्यांनी असा काही विलक्षण मारा केला की कितीतरी पाकी सैनिक मरण पावले. उरलेले पळून गेले. ते ठाणे भारतीय जवानांना लगेच जिंकता आले ! शत्रूच्या हे ध्यानीमनीही नसेल ! हेलीकॉप्टरचा हल्ला त्याला नवा होता. पश्चिम आघाडीवर कितीतरी ठिकाणी अशा तऱ्हेचे हेलीकॉप्टर्सचे धाडसी हल्ले हवाईदलाच्या वैमानिकांनी केले. शत्रूला पाहता पाहता गारद केले.

काश्मीर आघाडीवर एका उंचावरील चौकीवर अचानक बर्फ पडले. अशा वेळीच काही पाकी सैनिकांनी एकदम हल्ला केला. भारतीय जवानांनी निकराने तोंड दिले. पाकी राक्षस अधिक असूनही ते पळून गेले. त्यांचा पाठलाग करून काही सैनिक भारतीय जवानांनी ठार मारले. पाठलाग करताना बर्फावर पाय घसरून एक भारतीय उंचावरून एके ठिकाणी असा अडकून पडला की त्याला तेथून वरही येता येत नव्हते व खालीही जाता येत नव्हते. शिवाय तो जखमी झाला होता. त्याच्यावर तातडीचा इलाज करायला हवा होता. त्या चौकीतील प्रमुखाने वायरलेस संदेशाने हवाईदलाची मदत मागितली.

थोड्याच वेळात हिमालयाच्या त्या बर्फाळ अवघड भागातून कडे चुकवीत चुकवीत एक हेलीकॉप्टर अगदी कमी वेगाने येत

असलेले दिसले. महाभयानक दऱ्यातून ते वर सरकत होते. विंग. कमांडर सोनी अशा परिसरातून हेलीकॉप्टर कुशलतेने नेण्यात वाकबगार होते. फार काळजीपूर्वक वाटचाल करावी लागत होती. २५००० फूट उंच असलेल्या त्या परिसरात सगळीकडे बर्फ पडलेले होते. त्यामुळे हेलिकॉप्टरच्या उड्डाणात जरा अडथळे येत होते. पण त्या सर्व संकटांना तोंड देत विं. क. सोनी त्या जवानाजवळ पोहोचले. एक जीव त्यांना वाचवायचा होता. अगदी थोडी जागा असलेल्या एका ठिकाणी त्यांनी हेलीकॉप्टर उतरविले. पलीकडेच हजारो फूट खोलीची दरी पसरलेली होती.

त्या घायाळ जवानाला विं. क. सोनींनी अगदी काळजीपूर्वक त्या छोटया हेलीकॉप्टरमध्ये बसविले व जवळच्या हॉस्पिटलमध्ये आणून दाखल केले.


हिमालयाचे उंच कडे असो, बारमेरचे वाळवंट असो किंवा बांगलातील हिरवीगार शेती असो भारतीय हवाईदलाच्या हेलीकॉप्टर्सनी ह्या युद्धात लक्षात राहणारी कामगिरी केली आहे. घनदाट ढगातून हेलीकॉप्टर जाऊ शकत नाही. रात्रीच्या वेळी त्याचे उड्डाण फार काळजीपूर्वक करावे लागते. पण हवाईदलाच्या झुंजार वैमानिकांनी ह्या असल्या ‘ अस्मानी ’ संकटांना तर तोंड दिलेच पण ‘ याह्याखानी ’ राक्षसावर मात करून जगाचे डोळे दिपवून टाकले. त्यामुळे कितीतरी जखमी जवानांना जीवदान मिळाले. औषधे मिळाली. ऐनवेळी कुमक, दारूगोळा आणून दिल्यामुळे युद्धाचे पारडे एकदम बदलले. १९५४ मध्ये भारतीय लष्करात प्रथम हेलीकॉप्टर युनिट आणले गेले.

आज ते विकसित झाले आहे. जगाचे आश्चर्य वाढीला लागेल अशी कामगिरी त्याने करून दाखविली आहे.

ग्रुप कॅप्टन चंदनसिहांना त्यांच्या अलौकिक कामगिरीबाबत ‘ महावीर ’ चक्र मिळाले आहे.

* * *

# १. गळके विमान आणले!



छांब भागाइतकी तुंबळ लढाई दुसऱ्या कोणत्याही आघाडीवर झाली नाही. पाकिस्तानच्या जबरदस्त तडाख्याला भारतीय जवान बेधडक तोंड देत होते. मुनव्वर तावी नदीच्या परिसरात तर रक्ताचे लोट वाहिले. शत्रूला फार मोठी नुकसानी ह्या भागात पत्करावी लागली. प्रचंड चिलखती दलाच्या जोरावर शत्रू मुसंडी मारू इच्छित होता. पण त्याचा तो डाव यशस्वी झाला नाही. पाकी सेनापती जन. टिक्काखान तेथे तळ ठोकून होता. रोज नव्या वल्गना करीत होता. भारतीय जवान त्याला माती चारीत होते.

भारतीय जवानांनी फार निकराचा सामना या ठिकाणी दिला. त्यांना हवाई दलाने व्यवस्थित साथ दिली. याचा परिणाम असा झाला की पाकी सैनिकांना त्यांच्या हवाईदलाची सोबत लाभली नाही. कारण उघड आहे. भारतीय 'नॅट' व मिग–२१ ह्या विमानांची जबरदस्त भीती पाकी वैमानिकांनी घेतली होती.

छांब भागातील एका लष्करी विमानतळावर फ्लाईट लेफ्टनंट श्रीधर घटाटे हुकमाची वाट पाहात होते. ते व त्यांचे विमान तय्यार होते. एका पाकी विमानतळावर प्रचंड हल्ला करून ते नुकतेच परतले होते. तेथे विमानतळ होता की नव्हता असे स्वरूप त्या विमानतळाचे करून टाकले होते. तेथील 'हँगर' मध्ये असलेली पांच विमाने जागच्या जागीच नष्ट झाली होती. ती फ्ला. ले. घटाटे ह्यांनी हेरली होती त्यांच्या जवळ एक बॉम्ब उरला होता. तो येता येता एका पेट्रोलच्या टाकीवर त्यांनी टाकला. आगीचा प्रचंड लोळ निर्माण झालेला पाहून त्यांना मनस्वी आनंद झाला. त्याच आनंदात ते विमानतळावर परतले होते दुसऱ्या कामगिरीची वाट ते पाहात होते.

त्यांना फार वेळ थांबावे लागले नाही. मुनव्वर तावी नदीजवळ अटीतटीची लढाई चालू होती. शत्रूचे रणगाडे जबरदस्त होते. लांब पल्ल्याच्या तोफा होत्या. सगळीकडे आगच आग होती. ऐन वेळी शत्रूने आणखी कुमक आणल्यामुळे लढाईचे चित्र पालटते की काय अशी भीती निर्माण झाल्यामुळे अजून काही विमानांची मागणी करण्यात आली.

तावडतोब सहा विमाने मुनव्वर तावीकडे झेपावली. त्यात फ्ला. ले. घटाटे होते. शत्रूचे रणगाडे पिसाटासारखे धावत होते व आग ओकीत होते. ते बरोबर हेरून फ्ला. ले. घटाट्यांनी निकामी करून टाकले. काही तोफाही त्यांनी बंद पाडल्या. या अवचित हवाई हल्ल्यामुळे शत्रूला जबरदस्त दणका बसला. तो माघार घेऊ लागला. चिनी बनावटीचे T-re हे रणगाडे पटापट धाय मोकलून आडवे तिडवे होत होते. ही होती चिनी भेट. त्यांच्या शब्दाप्रमाणेच फसवी. याह्याखानाचा त्यांच्यावर फार

भरवसा होता. भुट्टोने भीक मागून ते आणले होते. जगप्रसिद्ध पॅटनची काय वाट भारतीय जवान लावतात हे साऱ्या जगाला माहीत होते. मग T·re ची काय वाट ? ह्या चिनी व अमेरिकन मोहजालातच अयूबखान फसला होता. आता याह्याखान फसू लागला होता. भारतीय पायदळाला इतकी उत्कृष्ट साथ हवाई दलाने दिली की शत्रूही चाट पडला. साऱ्या जगात ह्या गोष्टीचे आश्चर्य मानले गेले.

फ्ला. ले. घटाटे विलक्षण हट्टाला पेटले होते. मगरूर रणगाड्यांची वासलात कशी लावायची हे तंत्र त्यांना उत्कृष्ट जमले होते. एकेक रणगाडा नष्ट करीत करीत त्यांनी पायदळाचेही संरक्षण केले !

दुसरे दिवशी त्यांना लाहोरवर हल्ला करण्याचा हुकूम मिळाला. ते व त्यांचे सहकारी आता लाहोरकडे झेपावणार होते. त्यांच्या विमानांची अखेरची तपासणी चालू होती. आता काही क्षणातच हवेत ती झेपावणार होती.

फ्ला. ले. घटाट्यांच्या डोळ्यांसमोर 'लाहोर' म्हटले की एक विलक्षण चित्र उभे राहिले. त्यांना आठवले १९४७ साल. लाहोरला कितीतरी हिंदू कुटुंबे होती. त्यांची घरंदारं होती. जमीनजुमला होता. एका रात्रीत त्यांना मुसलमान गुंडांनी रस्त्यावर फेकलं. लुटलं. अत्याचार केले. कितीतरी हिंदूंची कत्तल केली. लाहोरमधून रक्ताचे पाट वाहिले. त्यांचा सहकारी फ्ला. ले. वर्मा मूळ लाहोरचा होता. तो सात आठ वर्षांचा असताना त्याला लाहोर सोडावे लागले. भारतात पळून यावे लागले. वेळ मोकळा असला की तो लाहोरच्या साऱ्या कटु आठवणी सांगायचा. त्याच्या वडिलांनी त्याला वारंवार काही काही सांगितलं होतं. त्याच्या

आईला पळवून नेण्यात आलं होतं. ती पुन्हा कधीच दिसू शकली नाही. यावेळी त्याच्या डोळ्यात पाणी यायचं. कितीतरी वेळा तो रडायचा. रडता रडता तो मुठी आवळायचा. त्याच्या डोळ्यांत खून चढायचा.

"श्रीधर" तो म्हणायचा, "माझे वडील मला लहानपणी नेहमी विचारायचे–बेटा–तू कोण होणार?–मी म्हणायचो–विमान-वाला होणार–कारण भारतीय सरहद्दीपासून आम्हाला विमानानं यायला मिळालं होतं–मला त्याचं फार आकर्षण वाटू लागलं होतं –वडील म्हणायचे ... तू जरूर हो विमानवाला–पण एक लक्षात ठेव जर कधी तुला संधी मिळाली तर लाहोरवर हल्ला कर!"

तेवढ्यात फ्ला. ले. घटाटे यांना निघावे लागले. त्यांचे विमान लाहोरकडे झेपावले! त्यांच्या मनातील हे विचार काही केल्या जाईनात. त्यांनी कितीही प्रयत्न केला असला तरी लाहोरच्या नागरी वस्तीवर त्यांना हल्ला करता आला नसता! कारण फक्त लष्करी यंत्रणा नष्ट करणे एवढेच भारतीय धोरण होते. लाहोरला पेट्रोलचा प्रचंड साठा होता. तो फक्त पेटवायचा होता. फ्ला. ले. घटाटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पेट्रोल साठ्यावर रॉकेट्सचा मारा करताच प्रचंड आग उसळली. ज्वाळा अक्षरशः गगनाला भिडल्या असे म्हणता येईल. कराचीला नाविक दलाने बंदरातील पेट्रोल साठे मोठ्या प्रमाणावर नष्ट केले होते आता लाहोरचे साठे संपविण्यात आले. आता याह्याला निश्चित पेट्रोल कमी पडले असते.

फ्ला. ले. घटाटयांनी निघताना लाहोर पाहून घेतले. ह्या नगरीत एकेकाळी केवढे रामायण घडले होते! आता नुसत्या आठवणी राहिल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी पुन्हा त्यांना पाकी हद्दीत जावे लागले. लष्करी साहित्य भरलेली एक आगगाडी त्यांना नष्ट करायची होती. एका

टेहळचा वैमानिकाने ही तातडीची खबर दिली होती. फ्ला. ले. घटाटे तयारच होते. त्यांचे विमान पिसाटासारखे हवेत झेपावले. काही क्षणातच ते पाकी हद्दीत शिरले. त्यांच्याजवळ नकाशा होता. ते ठिकाण येताच त्यांनी वेग कमी केला. आकाशात एक चक्कर उगाच मारली. त्यांना हवी असलेली आगगाडी आता सपाट मैदानातून दिमाखानं चाललेली होती. ते पाहता पाहता खाली झेपावले व रॉकेट्स सोडली. ऐटीत चाललेली आगगाडी आता उलटी पालटी झाली. आगीचा डोंब उसळला. दारूगोळ्याचे धडाधड स्फोट होऊ लागले. त्यांचे काम फत्ते झाले होते. शत्रूची रसद खलास झालेली होती. शिवाय आगगाडी नष्ट झाली. ते लगेच माघारी फिरले. काही मिनिटांतच हा खेळ झाला होता.

दुसऱ्या दिवशी ते विमानतळावर तयार होत असतानाच तातडीचा हुकूम त्यांना मिळाला. शत्रूची दोन विमाने आकाशात दिसू लागली होती. फ्ला. ले. घटाटे लगेच हवेत झेपावले. दोन राक्षस दोन विरुद्ध दिशेला होते. त्यांनी एकाचा पाठलाग करण्याचे ठरविले. दुसऱ्या विमानासाठी त्यांचा सहकारी त्यांच्या पाठोपाठ आकाशात उतरला होता.

फ्ला. ले. घटाटे व पाकी विमानाचा लपंडाव चालू झाला. पाकी विमान पळण्याच्या नादात असावे. कारण वैमानिकाने वेग वाढविला व दिशा बदलली. फ्ला. ले. घटाटेही त्याच्या पाठोपाठ धावले. पाकी विमानाच्या ते अगदी जवळ गेले. गोळ्या झाडल्या. त्या पाकी विमानानेही गोळ्या झाडल्या. त्यातील एक त्यांच्या विमानाला लागली. पण लगेच विमान वेगाने पळून गेले. हद्द त्याचीच होती.

आता फ्ला. ले. घटाटे परत फिरले. त्यांना वाईट वाटत होते


विमान ‘भरलेले’ होते. ते ‘रिकामे’ करणे आवश्यक होते. त्यांनी वेग कमी केला. ते शिकार शोधू लागले. तोच त्यांना रणगाड्यांचा एक तांडा हळूहळू सरकत असलेला दिसला. आता घाई करायला हवी होती. कारण त्यांचे पेट्रोल झपाट्याने कमी कमी होत चालले होते. मघाशी बसलेली गोळी पेट्रोलच्या टाकीत घुसली होती. केवळ दैवामुळे आग लागली नसावी ! फक्त गळती लागली.

फ्ला. ले. घटाटे झपाट्याने खाली आले. त्यांनी रणगाडे हेरून ते उडवून लावले. बंद पाडले. जाता जाता ही कामगिरी सहज पार पाडली होती. गळके विमान घेऊन ते आता आपल्या विमानतळाकडे झेपावले. ते जेव्हा विमानतळावर उतरले तेव्हाच पेट्रोलचा शेवटचा थेंब संपला !

फ्ला. ले. घटाट्यांची विविध स्वरूपाची तडाखेबंद कामगिरी पाहून त्यांना ‘वायु सेनापदक’ मिळून त्यांचा गौरव झाला आहे. नागपूरच्या ह्या तरुण वैमानिकाने ह्या युद्धात वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे.

* * *

# १०. कॅनबेरांची करामत



तीन डिसेंबरची संध्याकाळ. पंजाबातील एका लष्करी विमानतळाच्या चित्रपटगृहात चित्रपट दाखविला जात होता. दुसऱ्या महायुद्धावर आधारित इंग्जी चित्रपट अतिशय गाजलेला होता. दोस्त राष्ट्रांनी जर्मनीला कसे बेजार करीत आणले हे त्यात दाखविले होते. त्यात जर्मन हवाईदलाची नेत्रदीपक कामगिरीही आपल्या वैमानिकांना पाहण्यास मिळाली होती. विंग कमांडर के. के. बधवार, स्क्वाड्रन लीडर भद्रा, स्क्वाड्रन लीडर थापा, स्क्वा. ली. गिल, फ्ला. ले. सिंह अगदी रंगून गेले होते. चित्रपट अतिशय उत्कंठापूर्ण होता .. कसातरी चित्रपट मध्यंतरापर्यंत पाहिला तोच हवाई हल्ल्याचा सूचक भोंगा वाजू लागला. विमानवेधी तोफा आग ओकू लागल्या. विमाने पळून जाताच सारे वैमानिक आपापल्या विमानात जाऊन हुकमाची वाट पाहू लागले. विमाने तयार होतीच.

मध्यरात्रीपर्यंत वैमानिकांना वाट पाहावी लागली. मध्यरात्री दिल्लीला शत्रूला आव्हान देण्याचा निर्णय घेतला गेला. पाकिस्तानचा हा हल्ला अपेक्षित होताच ! प्रत्येक विमानतळावर सावधगिरी बाळगलेली होती. सर्व विमाने सुरक्षित ठिकाणी हलवलेली होती. प्रत्येक विमानतळावर ट्रॅन्समीटर्सद्वारा एकाच वेळी संदेश मिळण्याची व्यवस्था खास दिल्लीहून करण्यात आलेली होती. त्यामुळे दिल्लीत ठरलेला निर्णय सर्व लष्करी विमानतळांवर एकाच वेळी मिळत असे. शत्रूच्या हालचाली सर्वत्र एकदम कळत. तीन डिसेंबरला शत्रूने ३६ हल्ले केले पण भारतीय विमानदळाचे व विमानतळांचे काहीच नुकसान झाले नाही.

रात्री ११–५० ला भारतीय विमाने पाकी हद्दीत घुसली. सगळयात पुढे होती ‘ कॅनबेरा ’ बॉम्बर्स. अतिशय परिपूर्ण व लढाऊ अशी आहेत कॅनबेरा बॉम्बर्स. ‘ इस्रायली ’ पद्धतीचा हवाई हल्ला करण्याचा प्रयत्न पाकी हवाईदलाने करून पाहिला होता. त्यांची कल्पना अशी की भारतीय विमाने विमानतळावरच नष्ट करता येतील. पण त्या हल्ल्यामुळे एकही भारतीय विमान नष्ट झाले नाही. त्यांचा एकही बॉम्ब धावपट्टीवर पडला नाही !

ह्यामुळे जेव्हा रात्री भारतीय विमानांच्या झुंडीच्या झुंडी जेव्हा पाकी हद्दीत आतपर्यंत घुसल्या तेव्हा साऱ्या पाकी जनतेचीच काय पण याह्यासुराचीही झोप उडाली असेल.

विं. क. के. के. वधवार, स्क्वा. ली. भद्रा, स्क्वा. ली. थापा, स्क्वा. ली. गिल, फ्ला. ले. सिंह वगैरेंनी हाजीपीर खिंडीपासून ते कराचीपर्यंत सर्व पेट्रोल टाक्यांवर असे काही तुफानी हल्ले केले की सारे पश्चिम पाकिस्तान पेटून निघाले.

'कॅनबेरा' बॉम्बर्सनी अशी काही करामत करून दाखविली की एकही बॉम्ब अन्यत्र पडला नाही. पाकिस्तानचे दारूगोळ्याचे कारखाने, शस्त्रागारे, पुरवठा केन्द्रे, लष्करी वसाहती वगैरेंची संपूर्ण माहिती आपल्या कॅनबेरा बॅाम्बर्सना होती. रातोरात ह्या ठिकाणावर असे जबरदस्त हल्ले करण्यात आले की याह्या व भुट्टोच्या तोंडचे पाणी पहिल्याच दिवशी पळाले. त्या रात्री पेट्रोल टाक्यांमुळे ज्या सर्व पाकिस्तानभर प्रचंड आगी लागल्या होत्या त्याचे वर्णन आशियातील सर्वात मोठी आग असे करता येईल. शत्रूची महत्त्वाची ठिकाणे हेरून पद्धतशीर हल्ले करण्यात भारतीय हवाईदलाला विलक्षण यश प्राप्त झाले होते.

पाकिस्तानात इतक्या आतवर जाऊन हल्ला करणे सहजसाध्य नाही. ह्या बाबतीत विंग. कमांडर के. के. बधवार एका मुलाखतीत म्हणाले, "आम्हाला हुकूम मिळताच आम्ही बेधडक शत्रूच्या मुलखात घुसलो. शंभर शंभर पौंडांचे अगणित बॅाम्ब आम्ही त्यांच्या तेल साठ्यांवर प्रथम टाकले. काही ठिकाणी तर दोनशे पौंडी टाकले. शत्रूच्या लष्करी रेल्वे यार्डात तर पाचशे पौंडी बाँम्ब आम्ही टाकले! कमीत कमी वेळात शत्रूच्या महत्त्वाच्या केंद्रांना उद्ध्वस्त करण्याचा आमचा प्रमुख हेतू होता. हे 'टार्जेट' आम्ही पूर्ण केले, आम्हाला पूरेपूर आत्मविश्वास होता. आमच्या 'कॅनबेरावर' आमची श्रद्धा होती. निष्ठा होती. पाकिस्तानात सर्वत्र 'रडार'चे अक्षरशः जाळे आहे पण त्याला व ठिकठिकाणच्या विमानवेधी तोफांना दाद न देता आम्ही अगदी खालून पिसाट हल्ले केले. पावसासारखी बॉम्बची धार चालू ठेवली. याह्याखानाचे सारे डाव, साऱ्या योजना आम्ही अक्षरशः जमीनदोस्त केल्या!"

ह्या हल्ल्याचा परिणाम असा झाला की पाकी हवाई यंत्रणा कोलमडून पडली. ती इतकी की पुढे पुढे तर पाकी विमाने भारतीय हद्दीत यायची बंद झाली. त्यांच्या पायदळाला त्यांना संरक्षण देताही आले नाही.

' कॅनबेरा बॉम्बर्स ' च्या ह्या सर्व चालकांना वीरचक्राचा मान मिळाला. त्यांनी केलेली कामगिरी नेत्रदीपक ठरली. गेलेली सर्व ' कॅनबेरा ' सुखरूप परतली.

एका रात्रीत याह्याखानाचे कंबरडे इतके मोडले की त्याचे वारस आता पंचवीस वर्षे तरी वर येऊ शकणार नाहीत !

* * * *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५२८० नों. दि ......
वि. ९११-५० ......

IRBK-0116240

IRBK-0116240